Since 1965
SONI TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १६.०७.२०२५ | अंक नं. ९२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी
खरेदीवर पॉईंट
पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*

# नगरमध्ये अवजड वाहनाने घेतला आणखी एका तरुणाचा बळी


दिल्लीगेट परिसरात तरुणाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेला डंपर छायाचित्रात दिसत आहे.

## शहरात प्रवेशबंदी असताना अवजड वाहने येतातच कसे? प्रशासनाला आणखी किती बळी हवेत

नगर - शहरातील अतिशय वर्दळीच्या असलेल्या दिल्लीगेट परिसरात खडी मुरुम वाहतूक करणाऱ्या हायवा ढंपरखाली सापडून एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना १६ जुलै रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास घडली आहे. प्रकाश नाना अवचर (वय ३२, रा. दातरंगे मळा, नालेगाव) असे मयत युवकाचे नाव आहे. या प्रकरणी ढंपर चालकाविरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


प्रकाश अवचर (मयत)

सदरचा ढंपर हा नेप्ती नाका कडून दिल्लीगेट कडे येत असताना दिल्लीगेट वेशीच्या बाहेर असलेल्या शहर बस थांब्याजवळ या ढंपरने (क्र. एमएच १६ सीसी ८२४४) रस्त्याने पायी चाललेल्या प्रकाश अवचर यास धडक दिली. या धडकेत तो ढंपरच्या मागील चाकाखाली सापडून गंभीर जखमी झाला. त्याच वेळी दिल्लीगेट परिसरात असलेले त्याचे नातेवाईक राजकिरण कुमार पटेकर (रा. गौतम नगर, नीलक्रांती चौक) यांनी त्यास उपचारासाठी रुग्णवाहिका बोलावून जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले, मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. या अपघातानंतर ढंपर चालक ढंपर तेथेच सोडून पसार झाला. या प्रकरणी राजकिरण पटेकर यांच्या फिर्यादी वरून तोफखाना पोलिसांनी ढंपर चालक ऋषी बैस (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मयत प्रकाश अवचर याच्या पश्चात आई, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

### अवजड वाहनांमुळे वारंवार होतात अपघात

अरुंद रस्ते, वाढती अतिक्रमणे व अवजड वाहनांची रहदारी यामुळे नगर शहराचा श्वास कोंडला आहे. चौकांमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नगरकरांना वारंवार अपघातांना सामोरे जावे लागते. आजवर अनेकांचे बळी गेले. यावर उपाय म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी परिपत्रक काढून सकाळी व सायंकाळी ठरावीक कालावधीत अवजड वाहनांना शहरात प्रवेश करण्यास बंदी घातली. काही आठवडे या परिपत्रकाची अंमलबजावणी झाली. पण, सध्या जिल्हाधिकाऱ्यांचे *(पुढील मजकूर पान २ वर)*

१७ जुलै
३५ वर्षे सेवा, विश्वास आणि गुणवत्तेची
आपणा सर्वांच्या विश्वासाच्या पाठबळांवरच आम्ही ३४ वर्षे पुर्ण करून ३५ व्या वर्षात पदार्पण
२१ कोटी ठेवीकडे वाटचाल...
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.
MIS योजना
१,२०,०००/- ठेव ठेवा व १०००/- रु. प्रत्येक महिन्याला व्याज मिळवा...
मुदत ठेव योजना
१३ महिने ते २ वर्ष द.सा.द.शे. १०%
२५ महिने ते पुढे द.सा.द.शे. १०.५%
१० ग्रॅम सोनेतारणावर रु. ७०,०००/-
अल्पमुदत ठेव योजना - ४६ दिवस ते १ वर्षाच्या आत द.सा.द.शे. ९%
दामदुप्पट ठेव योजना ९० महिने
वाहन कर्ज योजना १५ %
सोनेतारण कर्ज सुविधा १२ %

| दरमहा भरावयाची रक्कम | मुदतीनंतर मिळणारी रक्कम | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १ वर्ष | २ वर्ष | ३ वर्ष | ४ वर्ष | ५ वर्ष |
| रूपये ५०० | ६३०० रू. | १३३२५ रू. | २१०५० रू. | २९६०० रू. | ३९०५० रू. |
| रूपये १००० | १२६०० रू. | २६६५० रू. | ४२१०० रू. | ६९२०० रू. | ७८१०० रू. |

लाभांष १२%
भागभांडवल २७.३६ लाख
ठेवी १४.९० कोटी
श्री. रखमाजी निस्ताने चेअरमन/ संस्थापक
श्री. चंद्रकांत औशीकर व्हा. चेअरमन
संचालक मंडळ - श्री. सागर चवंडके, श्री. अनंता औशिकर, श्री. जगन्नाथ वहिरवाडे, श्री. अमोल निस्ताने, श्री. रोहिदास नामदे, श्री. रामा विधाते, सौ. उषाताई खताडे, श्रीमती जयश्री बिडकर, श्री. संतोष थिवर, ● श्री. शंकर मिसाळ (सेक्रेटरी) ● तज्ञ संचालक - श्री. सुभाष भागानगर, श्री. होनजी गोडळकर ● तडजोड, गाऱ्हाणे आणि तक्रार निवारण समिती - सुभाष दारवेकर, गंगाधर सोनवणे
कर्मचारी वृंद - सचिन दिवटे, अजिंक्य कलागते, ऋषिकेश पासकंटी

# हत्ती बारव राष्ट्रीय संरक्षीत स्मारक होण्यासाठी प्रयत्न

## जिल्हाधिकारी, तहसीलदारांनी केली इतिहासप्रेमींसोबत पाहणी

नगर - जामखेड रोडवरील हत्ती बारव राष्ट्रीय संरक्षित स्मारक होण्यासाठीचा केंद्रीय पुरातत्व विभागाच्या प्रस्ताव प्रक्रियेत अडथळे येत असून हे अडथळे दूर करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही करण्यास सुरुवात झाली आहे, या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि तहसीलदार संजय शिंदे यांनी हत्ती बारवेला भेट देऊन पाहणी केली.

अहिल्यानगर जिल्ह्याला वैभवशाली इतिहास आणि ऐतिहासिक वारसा लाभला आहे. अराजक आणि उदासीन विचारसरणीमुळे हा ऐतिहासिक वारसा जतन करण्यात मात्र सर्वच स्तरांवर या ठिकाणी दुर्लक्ष झालेले दिसून येते. या दुर्लक्षित ऐतिहासिक वारसा स्थळांपैकी नगर-जामखेड मार्गावरील दरेवाडी आणि निंबोडी या गावाच्या हद्दीवर, शहरापासून तीन ते चार किलोमीटर अंतरावर असलेली ऐतिहासिक भव्य हत्ती बारव देखील एक असून सध्या तिची दुरावस्था झालेली आहे.

या हत्ती बारव ला जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया यांनी भेट देऊन पाहणी केली. सदर स्मारक संरक्षित होण्यासाठी असणाऱ्या बाबी आणि अडचणी समजून घेतल्या. यावेळी त्यांच्यासमवेत तहसीलदार संजय शिंदे तसेच तलाठी सुरेश येवले शिवाय केंद्रीय पुरातत्व विभागाचे कर्मचारी संदीप हापसे आणि एम आय आर सी चे सुभेदार दत्ता गावडे उपस्थित होते. बारवेची माहिती देण्यासाठी इतिहास प्रेमी सुरज कपाळे, नगर ट्रेकर्स परिवार उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सर्वात मोठी बारव अशी ख्याती लाभलेल्या या जलवास्तूला भेट देण्यासाठी आज देशभरातून लोक इथे येत आहेत. ही एक विजया प्रकारातली (चारही बाजूने विहिरीत उतरण्यासाठी पायऱ्या असलेली पायविहीर) बारव आपल्याला ऐतिहासिक वारसा म्हणून लाभली आहे. हा ऐतिहासिक वारसा आपण सर्वांनी मिळून पुढच्या पिढीला योग्यपणे हस्तांतरित करण्यासाठी तिचे संवर्धन आणि संरक्षण करणे आवश्यक आहे आणि ती आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. त्या करिता केंद्रीय पुरातत्व विभाग यांच्याकडे ही ऐतिहासिक वास्तू वर्ग करून त्याचे तांत्रिक रित्या जतन आणि संवर्धन करणे आवश्यक आहे.

छत्रपती संभाजीनगर मंडळात येणाऱ्या एकूण ७५ राष्ट्रीय संरक्षित स्मारकांपैकी जवळपास २९ स्मारके हे आपल्या नगर जिल्ह्यामध्ये आहेत. २९ संरक्षित स्मारकांपैकी सर्व स्मारके, ब्रिटिशांचे राज्य असताना संरक्षित केल्या गेल्या आहेत. हत्ती बारवेस राष्ट्रीय संरक्षित स्मारकाचा दर्जा प्राप्त झाल्यास, स्वतंत्र भारतात नगर जिल्ह्यातील पहिलेच राष्ट्रीय स्मारक असेल.

जिल्हा प्रशासनाने जिल्ह्याचे पालक तसेच प्रतिनिधी म्हणून केंद्रीय पुरातत्त्व विभागासोबत समन्वय साधून या भव्य वास्तूस संरक्षण प्राप्त करून दिले तर खऱ्या अर्थाने ऐतिहासिक स्तरावर या अमृत महोत्सवी वर्षाची अनुभूती सर्व जिल्ह्याचे नागरिक म्हणून घेऊ असे आम्हाला वाटते.

तांत्रिक बाबीची पूर्तता होण्यासाठी ज्या ना हरकती आवश्यक आहे त्यापैकी,

दरेवाडी ग्रामपंचायत हद्दीत या ऐतिहासिक वास्तूचा समावेश होतो त्या ग्रामपंचयतीतर्फे ना हरकत दाखला मिळाला आहे, वन विभागास ना हरकत मिळाली आहे, या वास्तूला लागून अनेक लष्करी विभाग यांची देखील ना हरकत मिळाली आहे, पीडब्ल्यूडी विभागाची ना हरकत बाकी आहे, हत्ती बारव हे नाव मालमत्ता पत्रकात नोंद करणे बाकी आहे.

केंद्रीय पुरातत्त्व विभागाला सदर ऐतिहासिक वास्तू स्वतःच्या अधिकारात घेण्याकरता वास्तूच्या मालमत्ता पत्रकामध्ये हत्ती बारव या वास्तूची नोंद समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा प्रशासन व तहसीलदार यांना कळवले. त्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रस्तावास मंजूरी दिली आहे, अशी माहिती इतिहासप्रेमी सुरज कपाळे यांनी दिली.

मग आजच घरी आणा अत्याधुनिक इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर जे बनवते जड व क्षारयुक्त पाण्याला शुद्ध!
इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर द्वारे
क्षारयुक्त पाण्यामुळे गळणाऱ्या केसांच्या समस्येपासून मुक्ती मिळवा.
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar 9145008009 / 9822542011

आपला माणुस, आपला चहा...
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा
एक वेळेस जरूर तुलना करून पहा
रत्नकमल चहा
आशिष ट्रेडर्स
चहा पावडरचे होक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


# बंद असलेले बसस्थानक त्वरित सुरु करून सर्व एसटी गाड्यांना भिंगारमध्ये थांबा द्यावा

**परिवहन अधिकाऱ्यांकडे भाजपाची निवेदनाद्वारे मागणी**

नगर - शहरातील बंद पडलेले एसटी बसस्थानक तत्काळ सुरु करून अद्यावत करावे, भिंगारमधून जाणारी प्रत्येक एसटी बसला येथे थांबा द्यावा, प्रवाशांना सर्व सोयीसुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा १५ दिवसांनी भाजपाचे पदाधिकारी तीव्र आंदोलन करतील अशा इशारा देत सर्जेपुरा येथील परिवहन अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, प्रकाश लुनिया, जिल्हा सरचिटणीस महेश नामदे, भिंगार मंडल अध्यक्ष सचिन जाधव, शामराव बोळे, आप्पासाहेब हंचे, राजेंद्र फुलारे, रुपेश फल्ले, चेतन वसगडेकर, साहेबराव विधाते आदी पदाधिकारी उपस्थित होते.



बंद असलेले बसस्थानक त्वरित सुरु करून सर्व एसटी गाड्यांना भिंगारमध्ये थांबा द्यावा या मागणीचे निवेदन देताना भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, प्रकाश लुनिया, महेश नामदे, सचिन जाधव, शामराव बोळे, आप्पासाहेब हंचे, राजेंद्र फुलारे, रुपेश फल्ले, चेतन वसगडेकर, साहेबराव विधाते आदी.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, भिंगार शहरात असलेले बसस्थानक परिवहन कार्यालयाच्या उदासिनतेमुळे गेल्या अनेक वर्षापासून बंद अवस्थेत आहे. त्यामुळे प्रवाश्यांची मोठी गैरसोय होत आहे. हे बंद बसस्थानक तातडीने सुरु करून त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. तसेच नाही भिंगार शहरातून जाणाऱ्या येणाऱ्या सर्व एस.टी बसला भिंगारमध्ये थांबा द्यावा. जेणेकरून भिंगार व पंचक्रोशीतील प्रवाश्यांना जाण्या- येण्यास सोयीचे होईल.

भिंगार येथील बसस्थानकात स्वच्छता करून तेथे प्रवाशांसाठी स्वच्छतागृह बांधुन, विद्युत पुरवठाही सुरु करावा. नागरिकांसाठी एस. टी. महामंडळाच्या ज्या काही योजना आहेत त्या मिळण्यासाठी तेथे कर्मचाऱ्यांची नेमणूक करा. तसेच त्या ठिकाणी प्रवाश्यांच्या सुरक्षांसाठी पोलिसांची नेमणूक करावी, प्रवाश्यांसाठी खाद्यपदार्थांचे स्टॉल उपलब्ध करून द्यावेत. सर्व मागण्या १५ दिवसाच्या आत पूर्ण कराव्यात अन्यथा भिंगार भारतीय जनता पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.

## प्रेरणादायी अक्षरधन...



### चांगल्या व्यक्तींनी शासन, प्रशासनात यावे



ज्यांच्यात अनेक सात्त्विक सुप्त गुण आहेत, ज्या व्यक्ती एखादा शोध लावून किंवा समाजाच्या उन्नतीसाठी, गोर गरीबांच्या सहकार्यासाठी विचार व कृती करणाऱ्यांनी आता शासन म्हणजेच राजकारणात, आयएएस, आयपीएस, सरकारी परीक्षांतून प्रशासनात यावे ही काळाची गरज आहे.

आपली कर्तव्ये, जबाबदाऱ्या, सामाजिक भान राखून पार पाडू शकणारा शासन, प्रशासन बहुसंख्याने वाढल्यास भारताची अर्थव्यवस्था तर प्रचंड होईलच आणि नैतिकदृष्ट्याही भारत जगात पुन्हा नेतृत्व करेल.

कॅप्टन कूल रेल्वेतच राहिला असता तर भारताला धोनी नावाचा करर्णधार मिळाला नसता. महात्मा गांधी बॅरिस्टर बनून पैसा, प्रतिष्ठ मिळवत बसले असते तर पारतंत्र्यात व्यापक नेतृत्व दिसले नसते. या प्रकरच्या नेतृत्वाची समाजाला, देशाला वेळोवेळी आवश्यकता असते. सध्याच्या शासनकर्त्या प्रशासकीय सेवेतून निवृत्त झालेली अनेक मान्यवर दिसतात.

देशाच्या उज्वल भवितव्याच्या दृष्टीने हे शुभसूचक वाटते. एक डॉक्टर आरोग्यमंत्री होणे, अर्थतज्ज्ञ अर्थमंत्री बनणे किंवा किमान पदवीधर, भूमीशी निगडीत कार्यकर्ता मंत्री झाला तर काही तरी चांगलं बनण्याची आशा वाढेल तरी पण उच्च पदस्थ अधिकारी आणि राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचारात चिंतामय परिस्थिती आहे.

त्यावर भरीव काम होणे अत्यावश्यक आहे. मनुष्याचा स्वभाव त्याच्यातील गुणांमुळे ओळखला जातो. सत्त्वगुण, रजोगुण, तमोगुण, हे प्रमुख ३ गुण व्यक्तीच्या स्वभावात, वर्तनात, आचरण म्हणजेच जीवनशैलीत असतात.

जग बदलणाऱ्या, देशाला पुढे नेणाऱ्या मनोधारणांना दिशा देण्याचे सामर्थ्य त्यांच्याठायी असते.

म्हणूनच कळकळीने व बहुसंख्य नागरिकांना वाटत असेल की आता तरी चांगल्या व्यक्तींनी, युवकांनी शासन, प्रशासनात यावे. समाजाची घडी बिघडवणारी भ्रष्टाचारी गुन्हेगारी, स्वार्थांधता कमी व्हावी यातच आपली सर्वांगिण समृद्धी सामावली आहे.



अवैध वाळू वाहतूक व दारु विक्रेत्यावर कारवाई केल्यानंतर जप्त मुद्देमालासह पोलिस अधिक्षकांचे विशेष पथक.

# अवैध वाळू वाहतूक व दारु विक्रेत्यावर छापा; ६१ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

नगर - कोपरगाव, नेवासा व पाथर्डी तालुक्यात अवैध वाळू वाहतूक व दारु विक्री करणाऱ्यांवर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या विशेष पथकाने मोठी कारवाई करत १० आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले असून त्यांच्या कडून ६१ लाख ७४ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई १५ व १६ जुलै रोजी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखालील पोलीस पथकाने केली.

या कारवायांमध्ये कोपरगाव तालुक्यातून ५५ लाख ५ हजार रुपये किमतीचे ट्रॅक्टर व डंपर, नेवासा येथून ६ लाख ०८ हजार रुपयाचा टेम्पो व वाळू, तर पाथर्डीत १६ हजार ६९० रुपयांची देशी विदेशी दारु जप्त करण्यात आली.

या कारवाईत ७ वाहनांसह ५ डंपर, १ ट्रॅक्टर, १ टेम्पो ताब्यात घेऊन २ दारु विक्रेते अटक करण्यात आले. काही आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरु आहे. ही कारवाई पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार शंकर चौधरी, अरविंद भिंगारदिवे, अजय साठे, दिगंबर कारखेले, मल्लिकार्जुन बनकर, दिनेश मोरे, उमेश खेडकर, सुनील पवार, सुनील दिघे, अमोल कांबळे, संभाजी बोराडे, दीपक जाधव, विजय ढाकणे, जालिंदर दहिफळे यांनी केली आहे.

# सिताराम सारडा विद्यालयातील खून प्रकरणातील फरार आरोपीस अटक

नगर - सिताराम सारडा विद्यालयातील खुन प्रकरणातील फरार आरोपी वसिम हमीद शेख, (रा.सर्जेपुरा, कैलारु कॅम्प, अ.नगर) यास तोफखाना पोलिसांनी पाठलाग करुन पकडले. ही कारवाई मुकुंदनगर परिसरात १५ जुलै रोजी करण्यात आली.



सिताराम सारडा विद्यालयातील खुन प्रकरणातील फरार आरोपी वसिम हमीद शेख याला पकडल्यानंतर त्याच्यासमवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

सिताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्याचा खुन झाला होता. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात २५ जून रोजी रात्री खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्यातील आरोपी वसीम शेख हा गुन्हा दाखल झाल्यापासुन फरार होता. तो पोलीसांना वेळोवेळी हुलकावणी देत होता. त्याचा शोध घेणेकरीता पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी यांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र पथक तयार केले होते. १५ जुलै रोजी पोलीस उपनिरीक्षक दळवी यांना माहिती मिळाली की, वसिम शेख हा मुकुंदनगर परिसरात त्याच्या नातेवाईकांकडे येणार आहे. अशी माहिती मिळताच गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार हे आरोपीचा शोध घेण्याकरिता मुकुंदनगर परिसरात गेले. पोलीस त्याचा शोध घेत असताना, पोलीसांची चाहुल लागली, त्यामुळे तो पळुन जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन ताब्यात घेतले.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, तोफखाना पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी व पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार सुनिल चव्हाण, अब्दुल कादर इनामदार, योगेश चव्हाण, भानुदास खेडकर, सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, सुजय हिवाळे, कपिल गायकवाड, महेश पाखरे, भागवत बांगर, जिजाबाई खुडे यांनी केली आहे.

## अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर - आजारी अवस्थेत आढळून आलेल्या ६५ वर्षीय अनोळखी इसमाचा औषधोपचारा दरम्यान जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाल्याची घटना ११ जुलै रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या मयत इसमाची ओळख पटविण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. मृत इसमाचे अंदाजे वय ६५ वर्ष असून रंग सावळा,नाक सरळ, केस पांढरे वाढलेले, दाढी वाढलेली पांढरी व अंगात लाल शर्ट, बरमुडा, गळयात तुळशीची माळ असे आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे. या मृत इसमास कोणी ओळखत असल्यास अगर त्याच्या नातेवाईकांबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तोफखाना पोलीस ठाणे फोन नं. ०२४१ - २४१६११८ या फोन वर किंवा पोलीस हवालदार सुनील आंधळे मोबाईल नं.. ९४०३६ ८५४२७ या नंबरवर संपर्क करावा असे आवाहन तोफखाना पोलिसांनी केले आहे.



जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी शिक्षण संघर्ष संघटना जुनी पेन्शन कोअर कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून निवेदन देण्यात आले.

# जुनी पेन्शन कोअर कमिटीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

### शपथपत्राची प्रत मिळावी तसेच जुनी पेन्शन योजना लागू करा अन्यथा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी 'जलसमाधी आंदोलन' करणार

नगर - १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या सकारात्मक शपथपत्राची प्रत मिळावी तसेच लवकरात लवकर जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी शिक्षण संघर्ष संघटना जुनी पेन्शन कोअर कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करुन कार्यालया मार्फत राज्य सरकारला निवेदन पाठविण्यात आले. या मागणीची दखल न घेतल्यास राज्यातील २६ हजार प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनात जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, कार्याध्यक्ष सुनील दानवे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनील पंडित, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, बाबासाहेब शिंदे, बद्रीनाथ शिंदे, राजू पठाण, किशोर झावरे, बापू झेंडे, कारभारी आवारे, देविदास दळवी, दिलीप रोकडे, जयमाला भोर, मिठू काळे, शाहिदा सय्यद, समीना शेख, वैभव सांगळे, एम.व्ही. वाघमारे, आफताब शेख, समद शेख, इमरान शेख, जमीर शेख आदी सहभागी झाले होते.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात सकारात्मक शपथ पत्र दाखल करण्यात आल्याचे राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आले आहे. यामुळे दि.१४ व १५ जुलै २०२५ पासून संघटनेचे राज्यातील पेन्शन पीडित बांधवांच्या समवेत आझाद मैदान येथील आंदोलन स्थगित करण्यात आले. या संदर्भात अधिवेशन काळात मुंबई येथे संघटनेचे राज्य अध्यक्षा डॉ. संगीता शिंदे (बोंडे) यांनी ८ जुलै रोजी शिक्षण मंत्री दादा भुसे यांची भेट घेतली असता शासनातर्फे जुन्या पेन्शनबाबत सकारात्मक शपथपत्र सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले असल्याची त्यांनी माहिती दिली. तर लवकरच जुनी पेन्शनबाबत कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. ७ व ८ जुलै रोजी आझाद मैदान येथे झालेल्या आंदोलनातील शिष्टमंडळाला देखील शिक्षण मंत्री भुसे व शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सभागृहात सुद्धा असेच मत व्यक्त केले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परंतु या सकारात्मक शपथपत्रात राज्य सरकारने नेमके काय म्हंटले आहे? हे जाणून घेण्याची उत्सुकता राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर बांधवांना लागली आहे. तरी महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या सकारात्मक शपथ पत्राची प्रत संघटनेला द्यावी व जुनी पेन्शन योजना लवकरात लवकर लागू करण्याची मागणी शिक्षण संघर्ष संघटना जुनी पेन्शन कोअर कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना देण्यात आले.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन दिलेली आहे. फक्त शिक्षण विभागातील माध्यमिक शिक्षकांना पेन्शन दिलेली नाही. या संदर्भात राज्य सरकारने दखल घेतली नाही, तर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी जलसमाधी आंदोलन करणार आहेत, असा इशारा महेंद्र हिंगे यांनी दिला.

## अमरसिंग परदेशी यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील नेहरू मार्केटच्या जवळ राहणारे अमरसिंग



गोपालसिंग परदेशी (वय ७७) याचे १५ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते हॉटेल अमर पॅलेसचे कल्पेश व माजी नगरसेवक प्रदीप परदेशी यांचे वडील होत.

## श्रीमती शोभाबाई कांकरिया यांचे निधन

नगर - बुरुडगाव रोड येथील रहिवासी श्रीमती शोभाबाई



सुभाष कांकरिया (वय ७०) यांचे १६ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगी, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या निलेश, निलीमा, सोनाली, निकीता यांच्या मातोश्री तर तर दिलीप, महेंद्र, सतिष, प्रदिप कांकरिया यांच्या चुलती होत.

## ज्योत्स्नाबाई नहार यांचे हृदयविकाराने निधन



नगर - बागडपट्टी येथील रहिवासी ज्योत्स्ना सुभाष नहार (वय ८०) यांचे १५ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ४ भाऊ, २ बहिणी, भाचे असा परिवार आहे. प्रकाश, प्रमोद, विजय, व देवेंद्र यांच्या त्या भगिनी होत.

## मल्लेशाम बोडके यांचे अल्प आजाराने निधन



नगर - वाणीनगर कमानी जवळील रहिवासी मल्लेशाम रामचंद्र बोडके (वय ८२) यांचे १४ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# नगरमध्ये अवजड वाहनाने घेतला आणखी एका तरुणाचा बळी

*(पान १ वरुन)*

आदेश झुगारुन अवजड वाहने पुन्हा शहरात प्रवेश करत आहेत. अशाच एका अवजड वाहनाखाली सापडून १६ जुलै रोजी दिल्लीगेट परिसरात एका तरुणाला आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे प्रशासनाला आणखी किती बळी हवे आहेत असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

### अवजड वाहनांना शहरात प्रवेश बंदी उरली कागदावरच

नगर शहरात सकाळी व सायंकाळी, तसेच ठरावीक वेळेत शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नोकरदारांची मोठी वर्दळ असते. स्थानिक नागरिकही कामानिमित्त घराबाहेर पडतात. अशा वेळी अवजड वाहनांनी शहरात प्रवेश केल्यास रस्त्यांवर मोठी वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडीमुळे आतापर्यंत शहरात झालेल्या अपघातांत अनेक निष्पापांचे बळी गेले आहेत. शहरातील अपघातांना आळा बसावा, याकरिता तत्कालिन जिल्हाधिकारी डॉ. पी. अन्बलगन यांनी सकाळी ९ ते १२ तसेच सायंकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत अवजड वाहनांना शहरात प्रवेश करण्यास बंदी घातली होती. मात्र आता ही प्रवेश बंदी केवळ कागदावरच राहिली असल्याचे दिसून येत आहे.

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राखण्याची जबाबदारी शहर वाहतूक शाखेची आहे. मात्र, या कार्यालयाचे मनुष्यबळ अपुरे आहे. याचा गैरफायदा घेत अवजड वाहने बेकायदेशीररित्या शहरात प्रवेश करतात. सोलापूर व पुणे महामार्गावरून, मनमाड रस्त्यावरून, छत्रपती संभाजी नगर रस्त्यावरून, तसेच कल्याण महामार्गावरून अवजड वाहने बिनदिक्कतपणे शहरात बेकायदेशीररित्या प्रवेश करीत असल्याचे आढळून आले. यात इतर राज्यांतून येणारे कंटेनर, ट्रेलर, तसेच वाळू वाहतूक करणाऱ्या मालट्रक, ढंपर यांचाही समावेश आहे. जिल्हा प्रशासन, पोलिस खाते व महापालिकेच्या उदासीन भूमिकेमुळेच ही परिस्थिती निर्माण झाली असल्याचे दिसून येत आहे.

### पोलिस प्रशासनाची बघ्याची भूमिका

अवजड वाहने भरदिवसा जिल्हाधिकाऱ्यांचा नियम तोडून बिनदिक्कतपणे शहरात प्रवेश करतात. मात्र, पोलिस व जिल्हा प्रशासन मात्र केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. वाहतुकीचे नियम फक्त कागदे रंगवण्यासाठीच आहेत का? अवजड वाहतुकीमुळे अनेकांचे बळी गेले आहेत. बाह्यवळण रस्त्याचे काम पूर्ण झालेले असताना ही वाहने शहरात प्रवेश करतातच कशी? आणखी किती निष्पाप नागरिकांचे बळी गेल्यानंतर प्रशासनाला जाग येणार आहे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### पोलिस अधिक्षकांनी सत्कार स्वीकारला मात्र अवजड वाहतुकीचा प्रश्न सुटला कुठे?

शहरातील अवजड वाहतुकीचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल एका संघटनेने काही दिवसांपूर्वी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा सत्कार केला. त्यांनी तो स्वीकारलाही. याबाबत वृत्तपत्रात बातम्या ही प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र खरेच शहरातील अवजड वाहतुकीचा प्रश्न सुटला आहे का? अवजड वाहने शहरात यायची बंद झाली आहेत काय? जर अवजड वाहने शहरात येत नाहीत तर मग हा अपघात झाला कसा? असे एक ना अनेक प्रश्न या घटनेमुळे उपस्थित होत आहेत.

शहरात रस्त्यांची कामे सुरु असल्याने पर्यायी मोजके रस्ते वाहतुकीसाठी नागरिकांना वापरावे लागत आहे. तसेच शाळा, महाविद्यालय सुरु झाल्याने त्यामध्ये अवजड वाहने शहरात आल्यास वाहतुक कोंडी व अपघात होत आहेत. त्यामुळे या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन पोलीस अधीक्षक घार्गे यांनी अवजड वाहने शहराच्या बाहेरुन वळविण्याचे आदेश पोलिस यंत्रणेला द्यावेत अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### ...नारळ पाण्याचे फायदेच फायदे

नारळ पाणी स्वतःच आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. विशेषतः उन्हाळ्यात नारळ पाणी पिणे चांगले मानले जाते. नारळाचे पाणी पिणे त्वचेपासून ते ताकद आणि पचनापर्यंत सर्व गोष्टींसाठी चांगले आहे. पण, जर तुम्ही त्यात काही खास गोष्टी जोडल्या तर त्याचे फायदे दुप्पट होतात नारळाच्या पाण्यात लिंबाचा रस मिसळून प्यायल्याने व्हिटॅमिन सीचे प्रमाण वाढते. हे मिश्रण रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते. वजन कमी करण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे. सब्जाच्या बियांमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. नारळाच्या पाण्यात सब्जा बिया मिसळून प्यायल्याने पोट बराच वेळ भरलेले राहते आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. हे मिश्रण शरीराला थंडावा देखील देते. चिया बियांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. नारळाच्या पाण्यात चिया बिया मिसळून प्यायल्याने शरीराला ऊर्जा मिळते आणि थकवा दूर होतो. हे मिश्रण वजन कमी करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. चिया बियांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. नारळाच्या पाण्यात चिया बिया मिसळून प्यायल्याने शरीराला ऊर्जा मिळते आणि थकवा दूर होतो.

## पाककला

### साबुदाणा गुळ लाडू

**साहित्य :** १/२ कप साबूदाण्याचे पीठ, ३/४ कप साजूक तूप, १ कप गुळ पावडर, ३ टेबलस्पून शेंगदाण्याचे कूट, ३ टेबलस्पून मील्क पावडर, २ टेबलस्पून बेदाणे, १/२ टिस्पून जायफळ पूड

**कृती :**प्रथम साबुदाण्याचे पीठ तुपावर छान भाजून घेतले. साबुदाण्याचे पीठ हे तूप सुटेपर्यंत खमंग भाजून घ्यावे. नंतर त्यात शेंगदाणे कूट मिक्स केले व थंड झाल्यावर त्यात मिल्क पावडर घालून मिक्स केले त्यात गुळ, जायफळ पुड घालुन गरजेनुसार साजूक तूप घालून मळून त्याचा गोळा बनवला. आता त्याचे लाडू बनवले. व तयार लाडू प्लेटमध्ये ठेवून सर्व्ह केले.

## वास्तू

✽ जर तुमच्या घरात खूप घरगुती वाद होत असतील आणि तुम्हाला त्याचे निराकरण करायचे असेल तर सकाळी पोछा लावताना पाण्यात थोडे मीठ मिसळा. मिठाच्या पाण्याने घर पुसल्यास घरातील सर्व प्रकारची नकारात्मक ऊर्जा दूर होऊ शकते. लक्षात ठेवा हा उपाय गुरुवार आणि शुक्रवारी करू नये. हा उपाय तुमच्या मन आणि मेंदूमध्ये सकारात्मक उर्जेचा प्रवाह वाढवेल.

✽ घराच्या मंदिरात किंवा कोणत्याही पवित्र ठिकाणी तुपाचा दिवा लावा. सभोवतालचे वातावरण शुद्ध करण्यासाठी आणि नकारात्मक ऊर्जा दूर करण्यासाठी दिव्याची ज्योत अत्यंत महत्त्वाची मानली जाते

## सल्ला

भाजीमध्ये मीठ जास्त झाल्यास कणकच घट्ट गोळे करा आणि ते भाजीत ठिकठिकाणी ठेवा. भाजीमध्ये थोडं पाणी टाका कढईवर झाकण ठेवून १० मिनिटे मंद आचेवर उकळू द्या. त्यानंतर गॅस बंद करून कणकेचे गोळे भाजीतून काढून घ्या. मीठ बॅलेन्स होईल.

## सौंदर्य

चमचे मध आणि २-३ चमचे लिंबाचा रस एकत्र करून चेहऱ्यावर याचा लेप लावून अर्धा तासा नंतर धुवून टाकावे. चेहरावर चमक आणि गोरेपणा येतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १७ जुलै २०२५

**कालाष्टमी, करिदिन, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, रेवती २७।३९, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४०मि.**

## राशिभविष्य

**मेष :** मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे. प्रेमात स्थिती अनुकूल राहील. महत्त्वाच्या कामांमध्ये सावधगिरी बाळगा.

**वृषभ :** सर्व कामे योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी आज आपण नियोजन कराल. वाहने काळजीपूर्वक चालवा. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा.

**मिथुन :**महत्वाच्या एखाद्या सामुदायिक योजनेत इतर लोकांबरोबर आपले सहकार्य तुमची उत्तम राजकीय जाण दाखवेल. देवाण-घेवाणीबाबत काळजीपूर्वक व्यवहार करा.

**कर्क :** स्थिती अनुकूल राहील. दिवस उत्तम राहील. वरिष्ठ लोकांचे कामात सहकार्य मिळेल. नवीन करार होतील. वडिलधाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**सिंह :** इतर लोकांना तुमचे विचार पटतील. नोकरदारांनी कामात लक्ष द्यावे. अधिकारी आपणास सहकार्य करतील. आपल्या आरोग्याची काळजी घ्या.

**कन्या :** मुलांवर खर्च होईल. महत्वपूर्ण कामे यशस्वीरित्या पूर्ण होतील. आरोग्य उत्तम राहील.

**तूळ :** अधिकाऱ्यांशी वाद-विवाद टाळण्याचे प्रयत्न करा. विरोधक पराभूत होतील. व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक.

**वृश्चिक :** आरोग्य उत्तम राहील. नवीन व्यावसायिक माहिती मिळेल. एखाद्या महत्वाच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. इच्छित कार्यात यश मिळेल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल.

**धनु :** कामात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. महत्वाच्या कार्यात यश मिळेल. आपल्या प्रकृतीची काळजी घ्या.

**मकर :** कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळा. आरोग्य उत्तम राहील. शत्रूंपासून सावध राहा. महत्वाच्या कामात सावधगिरी बाळगा.

**कुंभ :** अत्यंत व्यस्त राहाल. मनोरंजनावर खर्च होईल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. राजकीय कार्ये पूर्ण होतील.

**मीन :** अधिकार क्षेत्र वाढेल. शत्रूंना भीती वाटेल. आनंद वाढेल. आर्थिक स्थिती संमिश्र राहील.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# शब्दगंध क्र. ७२२२

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | | ५ |
| | ■ | ६ | | ७ | ■ | ■ | |
| ८ | ९ | ■ | १० | | ११ | १२ | |
| १३ | | १४ | ■ | ■ | १५ | | ■ |
| ■ | १६ | | १७ | | ■ | १८ | १९ |
| २० | ■ | २१ | | ■ | २२ | | |
| २३ | २४ | ■ | | ■ | २५ | | ■ |
| २६ | | | | ■ | | ■ | २७ |

**आडवे शब्द :-** १) गायनातील एक राग ४) हातोटी; कौशल्य ६) निश्चय; निकाल; नियम; सिद्धांत ८) उणे; कमी करणे १०) आपल्यापेक्षा वयाने मोठे (व्यक्ती) १३) तराजू; तागडी १५) नक्षत्र; चांदणी १६) एक प्रकारचे रत्न १८) डावा; वाईट २१) बरोबरी; हार; तुलना; माळ २२) परिचय; ज्ञान; इन्फॉर्मेशन २३) एक विषारी साप २५) पाढ्यातील सहाची संज्ञा २६) काडीमोड; घटस्फोट; सोडचिठ्ठी २७) इंग्रजी वर्षाचा पाचवा महिना

**उभे शब्द :-** १) माणुसकी २) गळा; घसा ३) सवय; अभ्यास ५) एक प्राणी; शेळी; अजा ७) साबण वगैरेचा षटकोनी तुकडा ९) अंथरण्याचे एक जाड वस्त्र ११) वेल; वल्लरी; लतिका १२) क्रमाक्रमाने (मालिका वगैरे) १४) उत्तराधिकारी; हक्कदार १७) लाकूड कापण्याचे हत्यार १९) बुद्धी २०) फायदा; लाभ २२) उदाहरण; नमुना २४) फळातील रसाळ भाग; मगज

### शब्दगंध क्र. ७२२१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | धि | का | री | ■ | प्र | खा | र |
| प | क्का | ■ | त | ळ | को | क | ण |
| वा | र | ■ | स | ■ | प | ■ | गा |
| द | ■ | जो | र | ■ | ■ | तो | डा |
| ■ | सां | ग | ■ | व | रा | ह | ■ |
| सा | धा | ■ | वा | स्तू | ■ | म | ध |
| मा | ■ | मा | या | ■ | ख्या | त | र |
| न | बी | न | ■ | खा | डा | ■ | ण |

# ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽ मुलांचे विश्व ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** दुसऱ्याला माफ करणे म्हणजे स्वतःला मुक्त करणे होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### व्हिटॅमिन पॅचेस म्हणजे काय?

तुम्ही व्हिटॅमिन पॅचेसबद्दल ऐकले आहे का? आजकाल हे सोशल मीडियावर खूप लोकप्रिय आहे. सहसा जेव्हा आपल्या शरीरात कोणत्याही पोषक तत्वाची कमतरता असते. जसे की व्हिटॅमिन्स ए, बी, सी, डी आणि इ. तेव्हा डॉक्टर आपल्याला आपला आहार सुधारण्यास सांगतात. जेव्हा आहारातून आवश्यक प्रमाणात जीवनसत्त्वे मिळत नाहीत, तेव्हा पूरक आहार दिला जातो. हे पूरक गोळ्या किंवा कॅप्सूलच्या स्वरूपात येतात. पण, अनेकांना ते खाण्यात अडचण येते. हे सप्लिमेंट्स काही लोकांना काही कारणांमुळे घेणे शक्य होत नाहीत.

अशात व्हिटॅमिन पॅचेस 'जीवनरक्षक' म्हणून काम करतात. हे व्हिटॅमिन पॅचेस शरीरावर चिकटवावे लागतात. स्टिकर्ससारखे दिसणारे हे पॅचेस शरीरावर सहज चिकटतात. जिथे तुम्ही ते चिकटवले, तिथे तुमच्या शरीरात जीवनसत्त्वे पोहोचू लागतात. व्हिटॅमिन पॅचेस हे लहान चिकट पॅचेस असतात. हे दिसायला बँडेजसारखे असतात. हे हाताच्या वरच्या भागात किंवा कंबरेवर लावता येतात. हे त्वचेमध्ये जीवनसत्त्वे आणि पोषक तत्वे शोषण्यास मदत करतात.

व्हिटॅमिन पॅचमध्ये एक विशेष यंत्रणा असते. याला ट्रान्सडर्मल ड्रग डिलिव्हरी सिस्टम हणतात. बाजारात अनेक प्रकारचे वेदनाशामक पॅचेस देखील उपलब्ध आहेत. लागू केल्यावर, औषध हळूहळू बाहेर पडते. नंतर ते त्वचेद्वारे शरीरात शोषले जाते. यानंतर वेदना रिसेप्टर्सवर परिणाम करतात. वेदना ग्रहण करणारे मेंदूला वेदनांचे संकेत पाठवतात. त्याचप्रमाणे व्हिटॅमिन पॅचेसमधून जीवनसत्त्वे बाहेर पडतात. जसे की व्हिटॅमिन सी, डी, बी१२, फोलेट, मॅग्नेशियम आणि लोह. या पॅचेसद्वारे हे सर्व पोषक तत्व शरीरात शोषले जातात. व्हिटॅमिन पॅचेस खूप प्रभावी आहेत. तथापि यावर अधिक संशोधन आवश्यक आहे. जर पॅच चांगल्या दर्जाचा असेल तर तो खूप प्रभावी आहे. परंतु परिणामकारकतेची पातळी वैयक्तिक आरोग्यावर, शरीराच्या प्रतिसादावर आणि पॅच कसा तयार केला जातो यावर अवलंबून असते. काही लोकांना व्हिटॅमिन पॅचेसचे चांगले परिणाम दिसू शकतात, तर काहींना तेवढे फायदे दिसत नाहीत.

तरीही हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचा सर्वोत्तम स्रोत म्हणजे योग्य आहार. व्हिटॅमिन पॅचेस हे फक्त एक सहाय्यक उपाय असू शकतात आणि कोणत्याही पौष्टिक समस्येचे निराकरण करण्यासाठी त्यांचा वापर करू नये, विशेषतः जर इतर कोणतेही गंभीर आरोग्य समस्या नसतील.

एकंदरीत व्हिटॅमिन पॅचेस ही एक सोयीस्कर आणि प्रभावी पद्धत असू शकते, परंतु ती सावधगिरीने आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार वापरली पाहिजेत. जर तुमच्याकडे यापैकी कोणत्याही विशिष्ट जीवनसत्त्वाची कमतरता असेल, तर आहार आणि पूरक आहारांद्वारे ती भरून काढण्यावर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे आहे.

## गुरुंचे स्थान

एक राजा होता. त्याला वाचन आणि लेखनाची खूप आवड होती. एकदा त्याने मंत्रिमंडळातून स्वतः साठी एक शिक्षकाची व्यवस्था केली. तो शिक्षक राजाला शिकवण्यासाठी येऊ लागला. राजा शिक्षण घेत असताना बरेच महिने गेले, पण राजाला कोणताही फायदा झाला नाही. गुरु दररोज खूप कष्ट करत होते पण राजाला त्या शिक्षणाचा कोणताही फायदा होत नव्हता.

राजा खूप नाराज झाला, गुरुच्या प्रतिभेवर आणि क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे चुकीचे होते कारण ते खूप प्रसिद्ध आणि सक्षम गुरु होते. शेवटी एके दिवशी राणीने राजाला सल्ला दिला की राजन, तुम्ही या प्रश्नाचे उत्तर गुरुजींकडूनच विचारावे.

एके दिवशी राजाने धाडस केले आणि गुरुजींसमोर आपली उत्सुकता मांडली, हे गुरुवर, कृपया मला माफ करा, मी अनेक महिन्यांपासून तुमच्याकडून शिक्षण घेत आहे पण मला त्याचा कोणताही फायदा होत नाही. असे का आहे? गुरुवर, कृपया या प्रश्नाचे उत्तर लवकर द्या, राजाने विनंती केली.

गुरुजी म्हणाले, राजन, हे प्रकरण खूपच लहान आहे पण तुमच्या 'वडील' असण्याच्या अहंकारामुळे तुम्ही हे समजू शकत नाही आणि काळजीत आणि दुःखी आहात. मी मान्य करतो की तुम्ही खूप मोठे राजा आहात. तुम्ही प्रत्येक बाबतीत माझ्यापेक्षा पद आणि प्रतिष्ठाने मोठे आहात पण इथे तुमचे आणि माझे नाते गुरु आणि शिष्याचे आहे.

गुरू असल्याने माझे स्थान तुमच्यापेक्षा वरचे असले पाहिजे, परंतु तुम्ही स्वतः एका उंच सिंहासनावर बसता आणि मला तुमच्या खालच्या आसनावर बसवता. हेच एकमेव कारण आहे ज्यामुळे तुम्हाला कोणतेही शिक्षण किंवा ज्ञान मिळत नाही. तुम्ही राजा असल्याने मी तुम्हाला हे सांगू शकलो नाही.

उद्यापासून, जर तुम्ही मला उच्च आसनावर बसवले आणि खाली बसवले तर तुम्हाला शिक्षण मिळू शकणार नाही असे कोणतेही कारण नाही.

राजाला सर्व काही समजले आणि त्याने लगेचच त्याची चूक मान्य केली आणि गुरुंकडून उच्च शिक्षण घेतले.

तात्पर्य : आपण आपल्या गुरुंना त्यांचे योग्य स्थान दिले नाही तर आपले कल्याण होणे कठीण आहे.



## जीवन का अमृत (भाग १)

पढ़ना, कुछ परिस्थितियों में, शिष्य की गलतियों की वजह से हो सकता है या उसकी अस्वस्थता से, जो कि आंतरिक उन्नति में बाधा डालती है ।

आप मानेंगे कि आंतरिक उन्नति मुख्यतया निर्विघ्न और शांत भजन- सिमरन से संभव है, जिसमें गहरी श्रद्धा और प्रेम से भरी भक्ति हो ।

क्रोध के पछतावे से अशांति और व्याकुलता आती है । प्रेम निश्चित ही सब परेशानियों का हल है ख

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

सब कुछ उसकी इच्छा और खुशी पर छोड़ दो और सब के साथ उसकी दया का इंतजार करो, जो कि पास ही है। कृपया निश्चित रहें कि पर्दे के पीछे हर चीज का लेख-जोखा रखा जा रहा है और आंतरिक सतगुरु अंतर में आपका स्वागत करने को उत्सुक है मैंने आपकी श्रद्धा, आपके इस रास्ते पर चलने के इरादे और इस रास्ते के लिए नियमित रूप से समय निकालने में आपकी कठिनाईयों के बारे में पढ़ा। इस रास्ते पर लगातार चलने के लिए एक बार और कोशिश करो तथा अपने व्यस्त समय में से थोड़ा सा समय निकालकर दोबारा से अभ्यास शुरू करो; नियमित हो जाने पर धीरे-धीरे इसे बढ़ाओ। एक बार शुरू हो जाने पर, आप पाएँगे कि इस तरह अर्पित किया गया समय आपकी जिंदगी के सामान्य कामकाजों, स्वास्थ्य और भलाई में विरले ही बाधा डालता है। मुझे यह जानकर खुशी हुई कि आप भजन-सिमरन में दो घंटे का

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

उसके पेट में भोजन पचाने के लिये जो रस निकल रहे थे बंद हो गये। कुत्ता वहां से हट जाने के बाद भी ६ घंटे तक बिल्ली के पेट में भोजन ठंडा पड़ा रहा। ऐसे ही अगर हम भी चिंता, भय, तनाव वा किसी अन्य दुःख में रह कर खाना खाते हैं तो वह खाना ठीक ढंग से नहीं पचता और इसका हमारे विचारों पर प्रतिकूल प्रभाव पड़ता है। भोजन शारीरिक, नैतिक, सामाजिक, आध्यात्मिक उन्नति करने वाला व स्नेह, प्रेम, दया, अहिंसा तथा शांति आदि गुणों को बढ़ाने वाला होना चाहिए।

इसके लिये गाय का दूध, त्रिफला चूर्ण, हरी पत्तेदार सब्जियां, मौसमी फल, कोई न कोई ड्राइ फ्रूट् अनाज तथा आंवला आदि पर्याप्त भोजन हैं। मन की भूख को तृप्त करने के लिये जितना ' प्रयत्न

### आज्ञा चक्र

किया जाता है भूख उतनी ही अधिक बढ़ती जाती है। उसे पूरा करने के लिये मन मनुष्य को छल कपट, लूट मार, अपराध, हत्या आदि कुकर्मों की ओर ले जाता है। जिस का परिणाम भय, अशांति, क्रोध, घृणा में मिलता है। मन की भूख ज्ञान से मिटती है।

इसलिये लक्ष्य रखो हर रोज १०-२० पेज किसी नई पुस्तक के पढ़ने हैं और भगवान को याद करना है। अगर नहीं पढ़ेंगे और भगवान को याद नहीं करेंगे तो मन की भूख नहीं मिटेगी और यह मन एक दिन आप को धरती पर ला देगा चाहे आप कितने ही महान हैं।

एक कहावत है, इसका पेट तो भर गया है परंतु आंखे (मन) भूखी हैं। यह मन का न भरना ही समस्याएं उत्पन करता है।

इस लिये तन की भूख वा मन की भूख में अंतर समझो। भोजन भी एक नशे का काम करता है। यही कारण है हरेक व्यक्ति का ज्यादातर समय निद्रा में जाता है। योगियों को अमृतवेले उठने की समस्या रहती है। नींद बहुत आती है। नींद को जीतने के लिये आप सुबह जो भी भोजन करते हैं, उस के सिर्फ २४ कौर ही खाने चाहिये और हर कौर २४ बार चबाना चाहिये। दिन भर में जब कभी भूख लगे तो हरी सब्जियां, फल आदि ही लेने चाहिये। वह भी २४ कौर से ज्यादा नहीं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**काका :** गणू परीक्षेची तयारी झाली का?

**गणू :** होय काका, काळी पेन, निळी पेन, शिस पेन्सिल, खोड रबर आणि सर्वच तयार आहे फक्त अभ्यास बाकी आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✽ भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती या कितव्या राष्ट्रपती होत्या?

- १२ व्या

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

कधीकधी मुले तीच तीच अक्षरे, अंक बघून कंटाळतात म्हणून साधारणतः एक अंक, अक्षर, आठवड्यापेक्षा जास्त वेळा दाखवू नये. महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सर्व अंकांची व अक्षरांची रिव्हिजन करावी. सर्व अंक, अक्षर ओळख झाल्यानंतर बाळाला दैनंदिन जीवनात ज्या ज्या गोष्टी समोर दिसत असतील त्यांचीही माहिती द्यावी उदा. हा पेन आहे. तो लाल रंगाचा आहे. हा टीव्ही आहे. हे पुस्तक आहे. एखाद्या दिवशी बाळाला बाहेर फिरायला घेऊन जाऊन सभोवताली दिसणाऱ्या गोष्टींचेही ज्ञान द्यावे. एक वर्षाच्या पुढील बाळाला स्वतःच्या हाताने जेवायला शिकवावे. याने त्याच्या बोटांमधील पकड मजबूत होण्यास मदत होते. तसेच पदार्थ थंड, गरम आहे का, हेही ज्ञान त्याला समजते. बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी पंचेंद्रियाचा विकास होणे गरजेचे आहे. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचा विकास होण्यासाठी बाळाला या

### बौद्धिक विकास कसा करावा?

पंचेंद्रियांद्वारे विविध अनुभव घेण्यास हाता. कानाचा विकास चांगला होण्यासाठी शिकविले पाहिजे. पहिल्या वर्षभरात बाळाला दोन ते तीन पदार्थांची चव माहीत असत १५ दिवसांचे झाल्यावर विविध फळांचा रस थोडा थोडा चाखण्यास द्यावा आणि

हाताळण्यास महिन्यांचे झाल्यावर त्याला विविध पेयपदार्थ नियमितपणे द्यावेत. विविध खेळणा दिल्यास स्पर्श व चक्ष या दोन्ही इंद्रियांचा विकास होतो. कानाचा विकास चागल बाळाशी कायम मधुर आवाजात संवाद साधावा. बाळाला विविध आवाजातील उदा. बासरीवादन, तानपुरा, बडबड गीते ऐकवावीत. तसेच कधी गॅलरीत उभे राहून गाड्या पक्ष्यांचे आवाजही ऐकवावेत.

पाचा विकास होण्यासाठी विविध पदार्थांचा वास त्याला द्यावा. तसच गुलाब, जाई, जुई, मोगरा या फुलांचा वास बाळाला द्यावा. फक्त वास देताना परागकणनाहा किवा बाळ फल गिळणार नाही, याची खबरदारी घेण्यासाठी फल थोड्या अतरावर घराव, बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी मुलांना पेपरमधील शब्दकोडे सोडविणे, बुद्धिबळ, खळ खळण, त्यासोबत सापशिडी, बुद्धीला चालणा देणारे विविध खेळ खेळण्यास द्यावे. यामध्ये मेंदूच्या उजव्या भागाला चालना मिळते. शालेय अभ्यासक्रमात मुख्यतः डाव्या बाजूच्या मेंदूचाच वापर कला जातो.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००




पुणे येरवडा येथे झालेल्या युथ वॉरियर कप निमंत्रित राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये एस जी स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीच्या ३० खेळाडूंनी सहभाग नोंदाविला असून स्पर्धेत सर्वच खेळाडूंनी अनेक पदकांची लयलूट केली.

# युथ वॉरियर कप स्पर्धेत एस जी स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमी ठरली तृतीय क्रमांकाच्या ट्रॉफीची मानकरी

नगर – नुकत्याच पुणे येरवडा येथे झालेल्या युथ वॉरियर कप निमंत्रित राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये एस जी स्पोर्ट्स अकॅडमीच्या ३० खेळाडूंनी सहभाग नोंदविला असून स्पर्धेत सर्वच खेळाडूंनी अनेक पदकांची लयलूट केली. कराटे स्पर्धेमध्ये कुमीते व काता या दोन प्रकारात प्राविण्यप्राप्त खेळाडू – (मुली)– मुस्कान शेख – सुवर्ण, ईशा गर्जे – सुवर्ण, विद्या प्रसाद – सुवर्ण व कांस्य, वरलक्ष्मी वड्डेपेल्ली – रौप्य, हर्शीदा प्रसाद – कांस्य, निधी दातीर – कांस्य, प्रतीक्षा शिरसाठ – कांस्य, श्रध्दा जायभाये – कांस्य, आराध्य जायभाये – कांस्य, अक्षदा भोर – कांस्य, समृद्धी भोई – कांस्य, कार्तिकी साळवे – कांस्य, संस्कृती सिनारे – कांस्य, निरूती धोतरे – कांस्य, पोर्णिमा वाघ – २ कांस्य पदक.

(मुले)– वरद कोकरे – सुवर्ण, श्रेयस साठे – सुवर्ण व कांस्य, फयाज शेख – सुवर्ण, प्रथमेश नीलवर्ण – सुवर्ण, अभिषेक वाघमारे – रौप्य, प्रणव मोहिते – रौप्य, आशिष वाघमारे – रौप्य, दर्शन विधाते – रौप्य व कांस्, आदित्य बोरुडे – रौप्य व कांस्य, समर्थ शिंगोटे – कांस्य, आशिष थदानी – कांस्य, विवेकानंद ठेणगे –२ कांस्य, ऋषिराज वड्डेपेल्ली –२ कांस्य, दिलदार शेख –२ कांस्य, श्रीराज जाधव – कांस्य पदक या खेळाडूंनी पदके मिळवून अहिल्यानगर शहराचे नाव सर्वत्र मोठे केले आहे.

या सर्व खेळाडूंना एस जी स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमीचे (संस्थापक) तसेच मुख्य प्रशिक्षक सेन्सेई सूरज गुंजाळ व अ‍ॅकॅडमीचे काही पदाधिकारी व पंच म्हणून उत्तम कामगिरी करणारे प्रशिक्षक पायल पवार, केतन जगताप, संस्कृती चव्हाण, लक्ष्मन दराडे, विशाल भंडारी या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# संत नामदेव महाराज पुण्यतिथीनिमित्त सावेडीत अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ



सावेडी शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड सप्ताहाचे उद्घाटन पिंपळेश्वर संस्थांचे हभप राऊत यांच्या हस्ते झाले.

नगर – साधू–संताच्या आशिर्वादाने समाजात प्रेम, बुद्धी, सहिष्णुता, सात्विकता वृद्धींगत होण्यासाठी संतांनी आपले आयुष्य सत्कार्णी लावले. समाजाला सर्वांपूर्ण, संस्कारक्षम व बलशाली होण्यासाठी नामयज्ञाचे महत्व आहे. नामदेव शिंपी समाज ट्रस्टने धार्मिक क्षेत्रात दिलेले योगदान हे महत्वपूर्ण असेच आहे. या सोहळ्याने सर्वांच्या जीवनात सुख–शांती–समाधान लाभणार आहे. तसेच संत नामदेव महाराजांचे कार्य अधिक व्यापक होईल, असे प्रतिपादन माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी केले.

सावेडी शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड सप्ताहाचे उद्घाटन पिंपळेश्वर संस्थांचे हभप राऊत यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी नगरसेवक रविंद्र वाकळे, माजी नगरसेविका वंदना ताठे, ट्रस्टच्या अध्यक्षा प्रमिला दुमाटे, सचिव राजू बगाडे, कृष्णा भस्मे, राजू पाटकुले, सुरेश लोळगे, हभप दत्तात्रय साबळे, हेमलता वडे, अनिता वाधवने, क्रांती काकडे, अरुणा काकडे, किसनराव पेहेरे, सुरेखा चौकटे, अशोकराव होमकर, श्रीकांत बुलबुले, महेश चौकटे, विठ्ठल वनारसे, प्रमोद गोंदकर, अतुल सातपुते, ज्ञानदेव वनारसे, संदिप वडे, छाया लिमकर, शितल चौकटे, भागवत लोळगे, सचिन कानडे, भागवत उपळे, सौदागर सदावर्ते, सोमनाथ पाटकुले, सुमन चौकटे, दत्तात्रय वनारसे, विष्णु वनारसे, शिवाजी बोंडगे, दिलीप पंतगे, सुनिल बोंडगे, अनिल गणबोटे आदी उपस्थित होते.

उपाध्यक्ष दिलीप काकडे प्रास्तविकात म्हणाले की, सोहळ्या निमित्त १६ जुलैपासून सुरु होणाऱ्या सप्ताहमध्ये विविध किर्तनकरांची किर्तने आयोजित केली आहे. यामध्ये हभप माधव रेळेकर, हभप अभय महाराज केजकर, हभप विलास महाराज मदने, हभप नवनाथ महाराज शास्त्री, हभप सोपान महाराज गुळमकर शास्त्री, हभप भागवताचार्य प्रेममुर्ती प्रेमानंद शास्त्री, हभप रामायणाचार्य प्रभाकर कावले, तसेच २३ जुलै रोजी सकाळी ८ ते १० यावेळेमध्ये दिंडी मिरवणुक व सकाळी १० ते १२ यामध्ये पिंपळेश्वर संस्थानचे राऊत दादा यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच राजू पाटकुले म्हणाले की, या सप्ताह अतंर्गत रोज सकाळी दैनंदिनी आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी महिला भजनी मंडळांचे भजन, हरिपाठ, भोजन व रात्री हरी किर्तन असे सात दिवस भरगच्च कार्यक्रम आयोजित केले आहे. त्रिपत पूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. तसेच २३ जुलै रोजी स्वास्थ्य हॉस्पिटल मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन तसेच जनकल्याण रक्त पिढीच्यावतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

सुत्रसंचालन राजेंद्र बगाडे यांनी केले. कृष्णा भस्मे यांनी आभार मानले. कार्यक्रमास नामदेव शिंपी समाज ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, युवक वर्ग, महिला मंडळ आदी उपस्थित होते.

# सविता रमेश फिरोदिया प्रशालेचे शिष्यवृत्तीत यश

## राज्य गुणवत्ता यादीत ३ विद्यार्थ्यांची निवड



आरव रासकर सृष्टी दाते आराध्या गाढवे

नगर – शिशु संगोपन संस्था संचालित सविता रमेश फिरोदिया प्रशालेला महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२४ मध्ये यश प्राप्त झाले आहे. या परीक्षेत शाळेचे एकूण २१ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून ६६% निकाल लागला आहे.

या विद्यार्थ्यांपैकी तीन विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत आपले स्थान मिळवले आहे.

रासकर आरव संदीप (२५६ गुण), दाते सृष्टी प्रकाश (२१८ गुण) आणि गाढवे आराध्या अविनाश (२१४ गुण) या तिघांनी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत आपले स्थान निश्चित केले.

या यशामध्ये शाळेतील प्राथमिक मुख्याध्यापिका योगिता गांधी यांच्यासह सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सातत्याने अभ्यासाची दिशा, परीक्षेचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि आत्मविश्वास यावर मार्गदर्शन केले.

याबद्दल विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शन करणार्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा, उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव र.धो. कासवा, सहसचिव राजेश झालाणी, खजिनदार अ‍ॅड. विजय मुनोत यांनी अभिनंदन केले.

# पर्यावरण संतुलनाच्या दृष्टिकोनातून सेंट विवेकानंद स्कूलचा अनोखा उपक्रम



पर्यावरण संतुलनाच्या दृष्टिकोनातून सेंट विवेकानंद स्कूलच्या विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्र तसेच घरात उपलब्ध असणाऱ्या पानांपासून पिशवी बनविण्याचा अनोखा उपक्रम राबविला.

नगर – सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये १२ जुलै जागतिक पेपर बॅग दिनाचे औचित्य साधून प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली एक अनोखा उपक्रम राबवण्यात आला.

प्लॅस्टिक पर्यावरणास घातक आहे. त्यामुळे प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर बंद करून, वर्तमानपत्र तसेच इतर घरात उपलब्ध असणाऱ्या पानांपासून सहजपणे पिशवी बनवता येऊ शकते हे या उपक्रमातून इयत्ता चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले.

एवढ्यावरच विद्यार्थी थांबले नाहीत तर या संदर्भात जनजागृती व्हावी म्हणून त्यांनी त्या पिशव्या त्यांच्या आजूबाजूच्या परिसरातील भाजीविक्रेते, फळ विक्रेते, किराणा दुकान या ठिकाणी वितरित केल्या आणि प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर बंद करून कागदी व कापडी पिशव्या वापरण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी बोलताना प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांना प्लॅस्टिक वापरण्यास किती घातक आहे. या संदर्भात माहिती सांगितली.

तसेच शाळेच्या प्राचार्या गीता तांबे यांनी विद्यार्थ्यांना प्लॅस्टिकचा वापर टाळा व पर्यावरण वाचवा असा संदेश विद्यार्थ्यांना दिला.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेष मध्यान यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

या उपक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# रंगोदय प्रतिष्ठानतर्फे राज्यस्तरीय ऑनलाईन भजन स्पर्धेचे आयोजन

नगर – रंगोदय प्रतिष्ठानतर्फे प्रथमच राज्यस्तरीय ऑनलाईन भजन स्पर्धेचे आयोजन केले आहे. यासाठी खुला गट हा एकच गट ठेवला आहे. ही स्पर्धा २ फेरीत घेतली जाणार आहे. अ. प्राथमिक फेरी – ही ऑनलाईन स्वरूपात होईल. ब. अंतिम फेरी – ही ऑफलाईन स्वरूपात होईल.

प्राथमिक फेरीतून १० भजनी मंडळाची अंतिम फेरीसाठी निवड केली जाईल. स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ५००१ रू. रोख सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ३००१ रू रोख सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक २००१ रू. रोख सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, २ उत्तेजनार्थ पारितोषिक ७०१ रू. रोख सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र दिले जाईल. असे पारितोषिकचे स्वरूप राहील. सर्व भजनीमंडळाला कमीत–कमी ५ आणि जास्तीत जास्त १० मिनिटाचा व्हिडिओ पाठवावा. हा नियम फक्त प्राथमिकसाठी आहे हे लक्षात घ्यावे.

प्रवेश निश्चित करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी ९९२२५७१८१३ किंवा ९३२५८०१६४७ यावर संपर्क साधावा. स्पर्धकांनी स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे उपध्यक्ष विशाल कडूसकर यांनी केले आहे. तसेच भजनाचा व्हिडिओ हा MP4 किंवा HD स्वरूपातच असावा, असे स्पर्धा प्रमुख जयश्री खिस्ती आणि श्रद्धा थोरात यांनी आवाहन केले आहे.

व्हिडिओ पाठवण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५ आहे.



शहिद ब्रिगेडियर मोहम्मद उस्मान यांच्या जयंतीनिमित्त मखदुम एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटी तर्फे आलमगीर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये मोफत वह्या वाटप करण्यात आले.

# शहिद ब्रिगेडियर उस्मान जयंती निमित्त मख़दुम सोसायटीतर्फे मोफत वह्या वाटप

नगर – शहिद ब्रिगेडियर मोहम्मद उस्मान यांच्या जयंतीनिमित्त मखदुम एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटीतर्फे आलमगीर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये मोफत वह्या वाटप करण्यात आले. यावेळी उपाध्यक्षा डॉ.शमा फारुकी, सचिव डॉ.कमर सुरुर, राजुभाई शेख, अकीला बाजी, मुख्तार शेख, मुख्याध्यापिका शेख जाकेरा, शेख नसरीन बानो, शेख शगूफता, सय्यद शाजिया, सय्यद रफअत, शेख शिरीन आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध बालगीते सादर केली. वह्यांसाठी वसंत पारधे, श्रीकांत सोनटक्के, डॉ.दमन काशीद, हेमंत नरसाळे, चारुता शिवकुमार, विका कांबळे, संजय भिंगारदिवे, अभय कांकरिया, राजुभाई शेख, डॉ.परवेज अशरफी, अ‍ॅड. गुलशन धाराणी आदिंनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. राजुभाई शेख यांनी आभार मानले.

# चांद सुल्ताना हायस्कूलच्या चेअरमनपदी मुशाहिद शेख




चांद सुल्ताना हायस्कूलच्या नूतन चेअरमनपदी मुशाहिद लियाकत शेख यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना संस्थेचे प्राचार्य व शिक्षक.

नगर – अंजुमन तरक्की–ए–उर्दू ट्रस्ट संचालित एटीयू चांद सुल्ताना हायस्कूलच्या चेअरमनपदी शेख मुशाहिद लियाकत यांची निवड झाली आहे. यानिमित्त त्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य शेख मोहम्मद समी इमाम, उपप्राचार्य शफी तांबोळी, पर्यवेक्षक सय्यद जफर हसन, शिक्षक सय्यद अबुनसर, मुनाफ, फिरोज, गुलजार, परवेझ कादरी, वसीम, कलीम, सलमान, आसिफ खान, सोहेल शेख, लिपिक जुहीब, शौकत आणि महिला कर्मचारी उपस्थित होते.

सत्कार समारंभात ट्रस्टच्या कार्यकारी मंडळाचे सभासद उपस्थित होते. टाळ्यांच्या कडकडाटात शेख मुशाहिद यांचे स्वागत करण्यात आले. त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नवनिर्वाचित चेअरमन शेख मुशाहिद लियाकत यांनी शाळेच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, शाळेत डिजिटल शिक्षणावर भर दिला जाईल. प्रत्येक वर्गात डिजिटल क्लासरूम विकसित करण्यासह, विद्यार्थ्यांना संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून आधुनिक शिक्षण देण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच, मैदानी खेळांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. या उपक्रमांमुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

# नगर शहरात १८ ते २० जुलैपर्यंत अखिल भारतीय क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा



नगर – अहिल्यानगरच्या लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, एसटी स्टँड रोड येथे १८ ते २० जुलै पर्यंत दुसरी नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय सोळाशे पेक्षा कमी मानांकित खेळाडूंसाठी बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली. या स्पर्धेत भारतातून खेळाडू बुद्धिबळ खेळण्यासाठी येणार असून आत्तापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू, तेलंगाना इत्यादी राज्यातून तीनशे च्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला आहे.

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिवस तसेच गुरुपौर्णिमा याचे औचित्य साधून वरील स्पर्धा आयोजित केली आहे, असे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

साडेचार वर्षाचा बाळ खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा यात आपले बुद्धीचे बळ पणाला लावणार आहेत.

१८ जुलै रोजी सकाळी १० वाजता ह्या स्पर्धेचे शुभारंभ होणार असून त्यानंतर स्पर्धा सुरू होणार आहे. या स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या होणार आहेत. २० जुलै रोजी दुपारी ४ स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

या स्पर्धेत विविध गटात पाच लाख रुपयांची प्रोत्साहन पर रोख बक्षिसे, आकर्षक ७० करंडक व सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र सुद्धा देण्यात येणार आहेत. प्रमुख पंच प्रवीण ठाकरे (जळगाव) हे असून त्यांना शार्दुल टापसे (सातारा), पवन राठी (सांगली), शिशिर (नागपूर), सनी गुगळे, प्रज्वल आव्हाड (नगर) आदी सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या नियम नियमावली नुसार होणार आहे.

स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्ज्याचे १०० लाकडी पट व सोंगट्या चा वापर होणार आहे. संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, परूनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रशांत गंगेकर, देवेंद्र ढोकळे, रोहित आडकर, मनीष जसवानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, देवेंद्र वैदय, संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ, सौ. रोहिणी आडकर आदी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संपर्क यशवंत बापट ९३२६०९२५०१ व पारूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८.

# वाळू चोरी प्रकरणी जमिनीवर ३ लाख रुपये दंड रकमेचा बोजा चढविण्याचे तहसिलदारांचे आदेश

नगर – नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथे २८ जुलै २००७ रोजी साहेबराव विठोबा पवार यांच्या मालकीचा व ड्रायव्हर चंद्रकांत साहेबराव पवार यांचा ट्रॅक्टर हा विनाक्रमांकाच्या ट्रॉली मधून अवैध वाळू वाहतूक करत होता. ही एक ब्रास अवैध वाळू वाहतुक गावचे तलाठी दगडखैर यांनी पकडली आणि वाळूसह ट्रॅक्टर प्रांत कार्यालय येथे जमा करण्याच्या सूचना दिल्या. तत्कालीन तहसीलदार भांगरे यांनी एक ब्रास अवैध वाळुसाठी ३१०० रुपये दंड केला. हा दंड पवार यांनी शासकीय खजिन्यात जमा करून एक ब्रास वाळूसाठी ३१०० रुपये दंड मान्य केला.

महसूल विभागाचे तत्कालीन तलाठी आणि मंडळाधिकारी यांनी या अवैध वाळूचा ओघ शोधला असता चिचोंडी पाटीलच्या मेहकरी नदी मधून, गट क्रमांक ६५२ व ६५३ मधून शेकडो ब्रास वाळू उपसा झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने नजर पंचनामा केला असता ३०० ब्रास वाळू उपसा झाल्याचे त्यांना लक्षात आले. या ३०० ब्रास वाळूसाठी ३ लाख रुपये दंड नगर तहसीलदार यांनी ठोठावला.

पुढे प्रत्यक्ष तंतोतंत मोजमापे घेतली असता ५११ ब्रास वाळू उपसा झाल्याचे महसुल विभागाच्या निदर्शनास आले. सदर ५११ ब्रास अवैध वाळूसाठी ३१०० रू. ब्रास प्रमाणे १५ लाख ८४ हजार रुपये दंड आकारण्याची मागणी करण्यात आली. मात्र पवार यांनी ३ लाख रुपये दंड मान्य नसल्याने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यांनी अपिल फेटाळून दंड कायम केला. पवार यांनी अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेले अपीलही फेटाळले गेले. त्यानंतर पवार यांनी विभागीय आयुक्त नाशिक यांच्याकडे अपील दाखल करून तदनंतर न्यायालयातही या प्रकरणी दाद मागण्यात आली. अहमदनगर जिल्हा न्यायालयामध्ये या प्रकरणी एकूण ८८ तारखा पडल्या.

आता पुन्हा या प्रकरणी तहसीलदार यांनी पवार यांना सदरचा दंड भरण्याचे आदेश दिले. परंतु पवार यांनी दंडाची रक्कम भरली नसल्यामुळे सक्तीने वसुली करण्यासाठी पवार यांच्या शेती गटांवर ३ लाख रुपयांचा बोजा चढवण्याचे आदेश नगर तहसीलदार यांनी पारित केले आहेत.

सदर प्रकरणी तीन लाख रुपये दंड वसुलीचे आदेश झाले आहेत. मात्र एकूण ५११ ब्रास वाळू उपसा केल्याबद्दल १५ लाख ८४ हजार रुपये दंड त्यावेळी होत होता. तो दंड १८ वर्षानंतर वाढवला गेला पाहिजे आणि संबंधितांवर गुन्हे दाखल व्हायला पाहिजे यासाठी पाठपुरावा सुरु असल्याचे माजी पंचायत समिती सदस्य तथा भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी म्हटले आहे.

# सोन्या–चांदीसह रोझ गोल्ड राख्यांची ए.एच.पोखरणा ज्वेलर्समध्ये व्हरायटी

## अमित व आकाश पोखरणा यांनी माहिती



नगर – ए.एच. पोखरणा ज्वेलर्सने सथ्था कॉलनी व सर्जेपुरा या दोन्ही दालनात सोने चांदीच्या दागिन्यांची नवीन आकर्षक डिझाईनची व्हरायटी उपलब्ध करून दिले आहे. श्रावणातील राखी पौर्णिमेच्या सणानिमित्त खास कलाकुसर असलेल्या राख्या दालनात आहेत. सध्या अनेकांच्या पसंतीस उतरत असलेल्या रोझ गोल्डच्या राख्यांचीही एक्स्लुझिव रेंज दालनात उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्वेलर्सच्या दोन्ही शाखांमध्ये रोझ गोल्डसह सोने, चांदीच्या राख्याही उपलब्ध आहेत, अशी माहिती अमित पोखरणा व आकाश पोखरणा यांनी दिली.

दालनात सोन्याचांदीच्या कलाकुसरीच्या नाजूक राख्यांसह खास रोझ गोल्डच्या राख्याही भरपूर व्हरायटीत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दालनात गंठणमध्ये अँटीक गंठण, पट्टी, राजकोट, डायमंड, मोती, काळे मणी, जेबी स्टोन, इटालियन मंगळसूत्र तसेच टेम्पल गंठणही उपलब्ध आहे. टेम्पलमध्ये नेकलेस, कानातले, अंगठी विविध डिझाईन उपलब्ध आहेत. दालनातील सर्व दागिने हॉलमार्क प्रणितच असून सोने (दागिने) मोडताना कुठल्याही प्रकारची घट कापली जात नाही. ५ ग्रॅमपासून ते १५० ग्रॅमपर्यंत वजनाच्या दागिन्यांची रेंज येथे आहे. डायमंडचे स्वतंत्र काउंटर सर्जे पुरातील दालनात आहे. चांदीचे पैंजण तसेच अन्य दागिने, भेट वस्तू, देवीदेवतांच्या मूर्ती, पूजा साहित्य, चांदीची नाणी दालनात आहेत.

# ‘थॅलेसेमिया मुक्त भारत’ करण्यासाठी संघटितपणे प्रयत्न होणे महत्त्वाचे

### डॉ.आशुतोष काळे यांचे प्रतिपादन; जनकल्याण रक्तकेंद्राच्या पुढाकारातून थॅलेसेमिया मुक्त भारत जिल्ह्यातील पहिली कार्यशाळा


जनकल्याण रक्तकेंद्राच्या पुढाकारातून ‘थॅलेसेमिया मुक्त भारत’ जिल्ह्यातील पहिल्या कार्यशाळेप्रसंगी उपस्थित सामाजिक संस्था, डॉक्टर्स आदी.

नगर – थॅलेसेमिया मुक्त भारत करण्यासाठी जनकल्याण समितीच्या वतीने प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. जनकल्याण समितीच्या वतीने महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांमध्ये जनकल्याण रक्तकेंद्र सुरू आहेत. थॅलेसेमिया या आजाराच्या समूळ उच्चाटनासाठी अहिल्यानगर येथील जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने जिल्ह्यातील पहिली कार्यशाळा होत आहे. थॅलेसेमिया ही जागतिक समस्या आहे. दरवर्षी देशात थॅलेसेमियाची दहा हजार बालके जन्म घेत असल्याने थॅलेसेमियाची होणारी चिंतेची बाब आहे. आत्तापर्यंत जनकल्याण रक्त केंद्राने ३८०० रुग्णांना १२००० रक्त पिशव्यांचे वितरण केले आहे. थॅलेसेमिया या आजाराविषयी समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. थॅलेसेमिया मुक्त भारत करण्यासाठी डॉक्टर्स, विविध सामाजिक सेवाभावी संस्था, प्रशासकीय यंत्रणा, विविध संघटना यांच्या माध्यमातून संघटितपणे प्रयत्न होणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन जनकल्याण समितीचे महाराष्ट्र प्रांताचे थॅलेसेमिया समन्वयक डॉ.आशुतोष काळे यांनी केले आहे.

बुरुडगाव रोडवरील हॉटेल परंपरा येथील सेमिनार हॉलमध्ये थॅलेसेमिया मुक्त भारत जिल्ह्यातील पहिली कार्यशाळा जनकल्याण रक्तकेंद्राच्या पुढाकारातून झाली. यावेळी विविध सामाजिक संस्था, डॉक्टर्स व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी जनकल्याण समितीचे महाराष्ट्र प्रांताचे थेलेसेमिया समन्वयक डॉ.आशुतोष काळे, जनकल्याण समितीचे प्रांत सहकार्यवाह मुकुल पाटगांवकर, अहिल्यानगर जनकल्याण रक्तकेंद्राचे सहकार्यवाह आदित्य चांदेकर, संचालक वैद्य रूपाली म्हसे, माजी कार्यवाह डॉ. दिलीप धनेश्वर, डॉ.अंजली केवळ, सिव्हिल हॉस्पिटलच्या थॅलेसेमीया विभागाच्या प्रमुख डॉ. रूपाली कुलकर्णी, बालरोग तज्ज्ञ डॉ.सुचित तांबोळी, डॉ.अमेय कांबळे, वैद्य लक्ष्मीकांत कोर्टीकर, डॉ.मिलिंद जोशी, रोटरी क्लब ऑफ अ.नगर सेंट्रल चे अध्यक्ष सुनील कटारिया, थॅलेसेमिया बालक राजू डहाळे, अशोक भोसले, डॉ.बागल, डॉ.लक्ष्मीकांत पारगावकर, डॉ.गौरी बोरकर, डॉ.प्रीती डुंगरवाल, नेहा तांबोळी, डॉ.गौरी जोशी, अजित एडके, नीलम परदेशी, शितल दळवी, सोनाली शिंदे, जनकल्याण रक्तकेंद्राचे स्मिता बडवे, अमित टकले उपस्थित होते.

मुकुल पाटगावकर म्हणाले, जनकल्याण समितीने थॅलेसेमिया सामाजिक प्रश्नावर काम करावे. असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सुचविले आहे. ६ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथे ४० संस्थांचे १०५ प्रतिनिधी एकत्र येऊन थॅलेसेमिया मुक्त भारत करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले होते. जनकल्याण समितीच्या साखळी रक्तकेंद्राच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात थॅलेसेमिया प्रकल्प समिती स्थापन होणार आहे. याचे पहिले पाऊल म्हणून अहिल्यानगर येथील कार्यशाळा होत आहे.

डॉ.अंजली केवळ प्रास्ताविकात म्हणाल्या, थॅलेसेमिया हा आई वडिलांकडून मुलांना होणारा अनुवंशिक आजार आहे. जर आई–वडील दोघेही थॅलेसेमिया वाहक असतील तर होणारे मूल थॅलेसेमिया बाधित असण्याची शक्यता २५% असते. थॅलेसेमिया आजारापासून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विवाहपूर्वी लग्नाच्या आधी तपासणी करणे आवश्यक आहे. यासाठी जनकल्याण रक्तकेंद्राने जिल्ह्यात प्रबोधनात्मक कार्यक्रम हाती घेतले आहे.

समाजातील व्यक्तींनी थॅलेसेमिया मुक्त समाज घडवण्यासाठी आपले योगदान देण्यासाठी पुढे यावे. अधिक माहितीसाठी तसेच आपल्या संस्थांमध्ये थॅलेसेमिया या विषयावर माहितीपर सत्रांचे आयोजन करण्यासाठी ८३७८९५८६९०, ९४२२३७६६४७ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जनकल्याण रक्तकेंद्रा मार्फत करण्यात आले.

स्वागत व परिचय डॉ.गौरी जोशी यांनी करून दिला. सूत्रसंचालन स्मिता बडवे यांनी केले. आदित्य चांदेकर यांनी आभार मानले.


अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या अध्यक्षपदी नवनाथ घुले तर सचिवपदी राजेंद्र बारगुजे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या अध्यक्षपदी नवनाथ घुले तर सचिवपदी राजेंद्र बारगुजे यांची नियुक्ती

नगर – अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाची बैठक नुकतीच पार पडली. राज्य महामंडळाचे अध्यक्ष संजयकुमार निक्रड यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली. नवनाथ घुले यांची अध्यक्षपदी तर राजेंद्र बारगुजे यांची सचिवपदी निवड करण्यात आली. २०२५ ते २०२८ या ३ वर्षांच्या कालावधीसाठी ही कार्यकारिणी राहणार आहे.

अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या कार्याध्यक्षपदी विष्णु मगर, उपाध्यक्षपदी भागवत गायकवाड, बाबासाहेब दौंड, अनिल वाकचौरे, खजिनदारपदी बाळासाहेब निवडुंगे, हिशोब तपासणीस सोमनाथ सुंबे, जिल्हा परीक्षा समिती परीक्षा प्रमुखपदी अविनाश बोंद्रे, परीक्षा समिती सदस्यपदी संजय रोकडे, दिपक शिंदे, अमोल देशमुख, भास्कर सुवर्णकार, सहसचिवपदी देविदास सातपुते, भाऊसाहेब इथापे, मयुर परदेशी, प्रसिध्दी प्रमुखपदी शहाजी मुन्तोडे, विद्या समिती सचिन कर्डिले, अतुल पटवा, नवनाथ साळवे, सल्लागारपदी सुनिल पंडीत, कल्याण ठोंबरे, राजेंद्र खेडकर, जालिंदर बलमे, दिलिपकुमार रणसिंग, कार्यकारिणी सदस्यपदी– भरत लहाने, सचिन सिन्नरकर, सुखदेव नागरे, सच्चिदानंद झावरे, राम मगर, भानुदास बांडे, बाबासाहेब मोहीटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नूतन कार्यकारिणीचा सत्कार राज्य महामंडळाचे अध्यक्ष संजयकुमार निक्रड, जिल्हा संघाचे नूतन अध्यक्ष नवनाथ घुले, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, संचालक बाबासाहेब बोडखे, संचालक महेंद्र हिंगे, राजेंद्र कोतकर, संचालक सुरज घाटविसावे, संचालिका वैशाली दारकुंडे, मंडळाचे सल्लागार प्राचार्य राजेंद्र खेडकर, माजी संचालक कल्याण ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आले.

## बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनच्या स्पर्धांचे २० जुलै रोजी अभिनेत्री विभावरी देशपांडे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण



नगर – बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनतर्फे १९ व २० जुलै रोजी स्व. सेठ शामसुंदरजी बिहाणी बंगडीवाला स्मृती राज्यस्तरीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धा आणि स्व. मनिष कुलकर्णी स्मृती राज्यस्तरीय आंतरशालेय सुगम संगीत स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. २० जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता या स्पर्धांचे पारितोषिक वितरण समारंभ अभिनेत्री विभावरी देशपांडे यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अभिनेते मिलिंद शिंदे यांनी दिली.

अभिनेत्री विभावरी देशपांडे यांनी सत्यदेव दुबे कार्यशाळेतून प्रशिक्षण घेतले असून त्यांनी आतापर्यंत अनेक चित्रपट व नाटकांमधून विविध भूमिका सादर केले आहेत. ग्रीप्स या संस्थेच्या त्या सदस्या असून मुलांसाठी अनेक नाटकांची निर्मिती त्यांनी केली आहे. श्वास, सातच्या आत घरात, हरिश्चंद्राची फॅक्टरी, नटरंग, चिंटू, देऊळबंद, स्वरगंधर्व सुधीर फडके, बालगंधर्व, देऊळ, अनवट, पोस्टकार्ड, तुया धर्म कोंचा हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट आहेत. हरिश्चंद्राची फॅक्टरी या चित्रपटातील भूमिकेसाठी त्यांना मिफ्ताचे सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक मिळाले आहे. अग्निहोत्र या मालिकेचे संवादलेखन देखील त्यांनी केले आहे.

बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनच्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण समारंभ २० जुलैला संध्याकाळी ६ वा. रावसाहेब पटवर्धन सभागृह सावेडी येथे होणार असल्याचे संस्थेचे सचिव विक्रांत मनवेलीकर यांनी सांगितले. स्पर्धक, पालक आणि नगरकरांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे असे आवाहन श्रीनाथ केसकर यांनी केले आहे.

## एन.आय.एस परीक्षेत प्रा.रोहन रंधवे उत्तीर्ण


परिक्रमा कॉलेजचे क्रीडा शिक्षक प्रा.रोहन रंधवे एन.आय.एस प्रशिक्षक व मार्गदर्शक परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले.

नगर – भारतीय क्रीडा मंत्रालय, भारतीय क्रीडा प्राधिकरण व नेताजी सुभाष इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट पतियाळा (पंजाब) यांच्या विद्यमाने भारतातील दोनशे क्रीडा प्रशिक्षकांची NIS क्रीडा प्रशिक्षक/मार्गदर्शक कोर्ससाठी निवड करण्यात आली होती.

यादरम्यान घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करून अ श्रेणीत परिक्रमा कॉलेजचे क्रीडा शिक्षक प्रा.रोहन रंधवे एन.आय.एस प्रशिक्षक व मार्गदर्शक परीक्षा उत्तीर्ण झाले. प्रा. रंधवे हे स्वतः महाराष्ट्र चॅम्पियन व शिवराय केसरी किताबाचे मानकरी असून त्यांचे मोठे बंधू पै.अजय रंधवे तीन वेळा ऑल इंडिया चॅम्पियन आहेत.

## सुगंधी तंबाखू व मावा बनविण्याच्या व विक्रीच्या गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – सुगंधी तंबाखू व मावा बनविण्याच्या व विक्रीच्या गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपी मजनु रक्षित शेख, सादीक रशीद शेख, अविनाश रावसाहेब पवार यास वैष्णवनगर केडगाव येथे राहते घरी महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेले व शरिरास अपायकारक होऊन दुखापतीची शक्यता आहे असा सुगंधी तंबाखू जन्य पदार्थ, मावा स्वतःचे कब्जात बाळगणे, तयार करणे व त्याची विक्री करण्याच्या बाबत वरील तिन्ही आरोपीं विरूध्द कोतवाली पोलिस स्टेशन येथे भा.द.वि. कलम ३२८, १८८, २७२, २७३, ३४ प्रमाणे गुन्हा रजि. नं. १०४/२०२२ चा दाखल होऊन त्याची अहमदनगर येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश क्र. ७ (सेशन केस नं. ५०/२०२३) ची दाखल झाली व सदरच्या केसमध्ये सरकार पक्षा तर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. या प्रकरणी आरोपींच्या वतीने ॲड. विशाल बबनराव पठारे यांनी सर्व साक्षीदारांचा घेतलेला उलट तपास व केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून अहमदनगर येथील जिल्हा न्यायाधिश क्र. ७ आर. एम. तायडे यांनी ९ जुलै रोजी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

आरोपीच्या वतीने ॲड. विशाल बबनराव पठारे (मोबा.नं. ७०४०५७०९७०) यांनी काम पाहिले व त्यांना ॲड. मयुरी विशाल पठारे यांनी सहकार्य केले.

## जीवनात वडिलधारी मंडळींचे अनुभवी मार्गदर्शन आवश्यक

### संतोष वन्नम यांचे प्रतिपादन; सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी चंद्रकांत पाठक यांचा ९० व्या वाढदिवसानिमित्त सत्कार


सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी चंद्रकांत धोंडीराम पाठक यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त सौ.कस्तूर यांच्यासह सपत्नीक संतोष वन्नम मित्र परिवारातर्फे सत्कार करून अभिष्टचिंतन करण्यात आले.

नगर – ज्येष्ठ मंडळींचा अनुभव व अभ्यास मोठा असतो. कुटूंबात वडिलधारी मंडळी असल्यास अनेक अडचणीच्या प्रसंगात त्यांच्या सल्लूयाची मदतच होते. चंद्रकांत पाठक हे असेच ज्येष्ठ मार्गदर्शक आम्हा मित्र मंडळींना लाभले आहेत. सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी असलेल्या पाठक यांनी कर्तव्यालाच परमेश्वर मानून आयुष्यभर प्रामाणिकपणे काम केले. शासनाने त्यांचा पुरस्कारानेही सन्मान केला आहे. वयाच्या नव्वदीतही त्यांचा उत्साह दांडगा आहे. नाविन्याची त्यांना आवड आहे. ते तरूणाईमध्येही तितक्याच सहजपणे समरस होतात. त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभावे, असे प्रतिपादन संतोष वन्नम यांनी केले.

सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी चंद्रकांत धोंडीराम पाठक यांचा ९० व्या वाढदिवसानिमित्त सौ.कस्तूर यांच्यासह सपत्नीक संतोष वन्नम मित्र परिवारातर्फे सत्कार करून अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी त्यांना मानपत्र देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी प्रशांत वड्डेपल्ली, तुषार बलदवा, सचिन बोडखे, डॉ. सुरेंद्र खोपे, प्रकाश बल्लाळ, प्रसाद मांढरे, योगेश सोमाणी, संदीप अट्टल, सुधीर भोगे, संजय पाठक, अजित परदेशी, प्रमोद गांधी, अरूण तडका, संतोष वन्नम आदी उपस्थित होते.

चंद्रकांत पाठक म्हणाले, आज नव्वदाव्या वाढदिवसानिमित्त तरूण मित्र परिवाराने केलेला सत्कार खूप उत्साह वाढवणारा आहे. तरूणांनी नेहमीच अनुभवी मार्गदर्शन मिळवून जीवनात यशस्वी वाटचाल केली पाहिजे. माझ्या परिवारातील पत्नी तसेच मुलांनी मला वेळोवेळी चांगली साथ दिली आहे. मुलगा संजय पाठक याचा मित्र परिवारही चांगला असून त्यांनी आठवणीने माझा वाढदिवस साजरा केला याचा आनंद आहे.


जैन कॉन्फरन्स अंतर्गत आत्मध्यान योजनेचे राष्ट्रीय मंत्री अशोक बलदोटा यांचा शपथविधी समारंभ पार पडला.

## जैन कॉन्फरन्स अंतर्गत आत्मध्यान योजनेचे राष्ट्रीय मंत्री अशोक बलदोटा यांचा शपथविधी समारंभ उत्साहात

नगर – श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स अंतर्गत राष्ट्रीय आत्मध्यान योजनेच्या राष्ट्रीय मंत्रीपदी नगरच्या अशोक बलदोटा यांची निवड झाली आहे. श्रमण संघीय आचार्य भगवंत डॉ.शिवमुनीजी म.सा., युवाचार्य महेंद्र ऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने व राष्ट्रीय अध्यक्ष शशीकुमारजी (पिंटूभाऊ) कर्नावट यांच्या नेतृत्वाखाली बलदोटा यांची निवड झाली. त्यांचा शपथविधी समारंभ आचार्य डॉ. शिवमुनीजी म.सा.व साधूसंत तसेच जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, सौ. रत्नप्रभा अशोक बलदोटा यांच्यासह हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.

नवीन कार्यकारिणीचे दर्शना लुणावत, चंद्रकांत चोरडिया, छत्रपती संभाजीनगर येथील १० ते १५ जैन कॉन्फरन्सचे कार्यकर्ते, निखिल संचेती, सिद्धार्थ शेटिया, संदेश कर्नावट, रंगेश बाफना, नयन ओस्तवाल, तेजस संचेती, तेजस कोठारी, राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा, अहिल्यानगर येथील जैन कॉन्फरन्सचे कार्यकर्ते उपस्थित होते. देशाच्या विविध भागांतून आलेले पदाधिकारी, कार्यकर्ते या कार्यक्रमास उपस्थित होते.


संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व संवर्धन करणे आवश्यक : सोमनाथ घार्गे

नगर – संस्थेने ६५ वर्ष अविरतपणे ज्ञानदानाचे कार्य उत्तम पद्धतीने केले आहे. शाळेची प्रगती कौतुकास्पद आहे. पर्यावरण ही काळाची गरज असल्याने वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण करून शाळेने सामाजिक कार्यास हातभार लावला आहे. पाऊस काळात वृक्षारोपण केल्यास ती रोपे लवकर रुजतात. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले आहे.

कल्याण रोड ड्रीमसिटी येथील स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे श्री लक्ष्मीनारायण शिशु शिक्षण मंदिर संचलित संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेचा ६५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच प्रमुख अतिथी सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, खजिनदार गजेंद्र सोनवणे, कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे, ज्येष्ठ सल्लागार अरविंद धिरडे, सचिव विजय मानकर, शालेय शिक्षण समितीचे चेअरमन जितेंद्र लांडगे, सचिव संजय सागांवकर, मुकूल गंधे, सचिन मडके, सुनिल पावले, किशोर विंचुरकर, राकेश गवते, गणेश झिंजे, अभिजीत अष्टेकर, नीरज चांगटे, योगेश पांढरपोटे, प्रदीप दळवी, निलेश मिसाळ, रोहन आकडे, अनिता कांबळे, वनिता पाटेकर, शैला मानकर, मुख्याध्यापिका कल्पना भामरे, जगन्नाथ कांबळे, सुशीलकुमार आंधळे, शेख बबन, राजेंद्र गर्जे, चंदा कार्ले, वैशाली केदारे, अनिता जपकर, सुरेखा कर्डिले, रोकडे मॅडम, विद्या नरसाळे आदींसह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

सूत्रसंचालन राजेंद्र गर्जे यांनी केले. बबन शेख यांनी आभार मानले.

## भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलातर्फे प्रथमच मंगळागौर स्पर्धेचे आयोजन

नगर – भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलातर्फे श्रावण महिन्यात मंगळागौर स्पर्धे चे आयोजन केले आहे अशी माहिती सावेडी मंडलाध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांनी दिली. यासाठी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

हिंदु संस्कृतीमध्ये श्रावण महिन्याला खूप महत्व आहे. या महिन्यामध्ये विविध सणांची रेलचेल असते. मंगळागौर हा सण महिलांसाठी तर खूपच महत्त्वाचा असतो. यामध्ये एकूण ११० खेळ, गाणी म्हणत खेळले जातात. यामध्ये फुगडी, झिम्मा, अडवळ घुम पडवळ घुम, साळुंकी, सवतीचे भांडण, सासू–सून भांडण, आगोटा पागोटा, गाठोडे, लाटा बाई लाटा, वटवाघूळ असे अनेक खेळ खेळले जातात. साधारणतः २१ प्रकारच्या फुगड्या आणि ६ प्रकारचे आगोटे पागोटे यामध्ये असतात.

माऊली सभागृह येथे २ ऑगस्ट रोजी या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये महिला प्रेक्षकांसाठीही उखाणे स्पर्धा, उत्तम पारंपारिक वेशभूषा स्पर्धा, लकी ड्रॉ अश्या विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या संघाला रोख रु. २१,०००, ट्रॉफी व काळे’ज ऑर्किड रिसॉर्ट मध्ये एक दिवस राहण्यासाठी मोफत. द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या संघाला रोख रु. १५,०००, ट्रॉफी व काळे’ज ऑर्किड रिसॉर्ट मध्ये एक दिवस राहण्यासाठी मोफत. तृतीय क्रमांकाला रोख रु. ११,००० व ट्रॉफी देण्यात येणार आहे. उत्तेजनार्थ प्रत्येकी रु. ३,००० ची तीन बक्षिसे देण्यात येणार आहेत.

सहभागी सर्व संघातील सदस्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. प्रथम येणाऱ्या १२ संघानाच प्रवेश दिला जाणार आहे. प्रवेशिकेसाठी सावेडीसाठी प्रियाताई जानवे ९३७३६ २८५७६, प्रतिक्षा रसाळ ९७६२१ ००३१०, तर शहरासाठी गीता गिल्डा ९८५०५ ६९१९६, कालिंदीताई केसकर ९४०५३ ४८०५१ यांना संपर्क करण्यात यावा.

## जिल्हा फुटबॉल संघटनेचा खेळाडू कृष्णराज टेमकरची महाराष्ट्राच्या संघात निवड



नगर – नुकतीच मुंबई येथे महाराष्ट्र ज्युनियर बॉईज संघाच्या निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिर पार पडले. यामध्ये अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल संघटनेचा खेळाडू कृष्णराज गुरुदत्त टेमकर याची महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे.

नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेमधील कामगिरीनुसार संपूर्ण राज्यभरामधून ३६ खेळाडूंची निवड या प्रशिक्षण शिबिरासाठी करण्यात आली होती. जिल्हा संघटनेचे खेळाडू कृष्णराज टेमकर, भानुदास चंद आणि जसवीर ग्रोव्हर हे शिबिरात सहभागी झाले होते. टेमकर याच्या उत्कृष्ट कामगिरीने त्याची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

कृष्णराज टेमकर हा आठरे पाटील पब्लिक स्कूलचा विद्यार्थी असून, मागील वर्षी त्याने महाराष्ट्र सब–ज्युनिअर संघाचे देखील प्रतिनिधीत्व केले होते. तो महाराष्ट्र ज्युनिअर बॉईज संघात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या डॉ.बी.सी. रॉय ट्रॉफी स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहे. ही स्पर्धा अमृतसर पंजाब येथे २० ते ३० जुलै दरम्यान पार पडणार आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २७ जुलै रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

सदर आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, मिरवणुका किंवा प्रेतयात्रांवरील जमावास लागू राहणार नाही. तसेच पोलीस अधिकारी, कामावर असलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच सभा अथवा मिरवणुका काढण्यासाठी रीतसर परवानगी घेतलेल्या व्यक्तींनाही हा आदेश लागू होणार नाही.

या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# वायुदलाची धावपट्टीच विकली!



चोर, चोरी, चोरीचे प्रताप आणि तत्सम अनेक घटना आजवर प्रत्यक्षात घडल्या आहेत आणि काही घटना तर चित्रपटांतूनही अनेकांनी पाहिल्या आहेत. फसवाफसवीचे हे प्रकार कायमच चर्चेचा विषय ठरत असताना आता त्यात आणखी एका भयंकर प्रकरणाची भर पडली आहे.

पंजाबच्या फिरोजपूरमधील हा प्रकार असून, तिथे एका माय-लेकाच्या जोडीने घर, शेतशिवार नव्हे, तर चक्क अशी वस्तू विकली आहे, जी पाहून भल्याभल्यांना घामच फुटला. उपलब्ध माहितीनुसार या आई आणि मुलाने वायुदलाची ऐतिहासिक धावपट्टीच विकली. याच धावपट्टीवर १९६२, १९६५ आणि १९७१ च्या युद्धांच्या वेळी भारतीय वायुदलाची विमाने उतरली होती. २८ वर्षांपूर्वीच्या या कारनाम्याचा उलगडा नुकताच झाला असून उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या मायलेकाच्या जोडीविरोधात विविध कलमांअंतर्गत फिर्याद दाखल करण्यात आली.

एका तक्रारीनंतर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. निशान सिंह यांनी 'पंजाब व्हिजीलन्स ब्यूरो'च्या अध्यक्षांना उद्देशून एक पत्र लिहून तपास करण्याची मागणी केली. दुमनी गावातील उषा अंसल आणि तिचा मुलगा नवीनचंद अंसल याने काही अधिकाऱ्यांच्या साथीने पद्धतीने भूखंडावर मालकी हक्क सांगत त्याची विक्री कशी केली हे त्यांनी दाखवून दिले. प्राथमिक स्वरुपात तक्रार करूनही तपास झाला नाही, असे कळताच निशान सिंग यांनी पंजाब- हरियाणा न्यायालयात याचिका दाखल केली आणि न्यायालयाने या प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश दिले. तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार भारत आणि पाकिस्तान सीमेनजीक फत्तुवाला गावात ही हवाई पट्टी असून १२ मार्च १९४५ मध्ये ब्रिटीश शासनाने दुसऱ्या महायुद्धादरम्यान 'रॉयल एअरफोर्स'साठी ती अधिग्रहित केली होती. पुढे हीच धावपट्टी भारतीय वायुसेनेच्या ताब्यात आली आणि तीन युद्धांमध्ये तिचा वापर करण्यात आला. बहुतांशी लँडिंग ग्राऊंड म्हणून तिचा वापर झाला होता.

या प्रकरणाच्या मुळाशी पोहोचण्याचा प्रयत्न झाला तेव्हा उषा अंसल आणि नवीनचंद अंसल याने काही अधिकाऱ्यांच्या मदतीने हेराफेरी करत आपणच या जमिनीचे मालक असल्याचे भासवले आणि ती १९९७ मध्ये ती विकून टाकली. मदन मोहन लाल नामक व्यक्ती या जमिनीचे मूळ मालक असून त्यांचा मृत्यू १९९१ मध्ये झालेला असतानाही १९९७ मध्ये त्यांच्याच नावे बनावट कागदपत्र तयार करण्यात आले. न्यायालयीन हस्तक्षेप आणि कठोर ताशेऱ्यानंतर अखेर मे २०२५ मध्ये ही जमीन औपचारिक स्वरुपात पुन्हा एकदा संरक्षण मंत्रालयाकडे सोपवण्यात आली.

# कॅलिडोस्कोप

## छोट्याशा खोलीचे भाडे लाखात !



लंडनच्या पॉश केन्सिंग्टन भागात राजघराण्यातील मंडळी आणि अब्जाधीश राहतात. येथे ४७ वर्षीय सीझर मेंडेझ गेल्या चार वर्षांपासून ११.७ चौरस मीटरच्या एका छोट्या फ्लॅटमध्ये राहत आहे. हे घर इतके लहान आहे, की ते एखाद्या 'वॉर्डरोब' एवढेचच आहे. असे असूनही, सीझर या घराच्या भाड्यापोटी लाखो रुपये खर्च करत आहेत. एकेकाळी ती एका चौकीदाराची खोली होती. ती आता एका फ्लॅटमध्ये रूपांतरित झाली आहे.

त्याचे मासिक भाडे १,४०० पौंड (म्हणजे सुमारे १.५ लाख रुपये) आहे. हा फ्लॅट श्रीमंतांच्या परिसरात असल्याने त्याची किंमत २,५०,००० पौंड (म्हणजे सुमारे २.७ कोटी) असल्याचा अंदाज आहे. स्पेनमधील टेनेरिफ येथून आलेले सीझर म्हणतात, या छोट्या घरापासून 'नॅचरल हिस्ट्री म्युझियम' खूप जवळ आहे, तर 'हाइड पार्क' फक्त पाच मिनिटांच्या अंतरावर आहे. इतकेच नाही तर सीझर अनेकदा राजघराण्यातील सदस्यांना त्याच्या खिडक्यांमधून जाताना पाहतात. ते म्हणतात, मी प्रिन्स चार्ल्स, प्रिन्स विल्यम आणि क्वीन कॅमिला यांचा काफिला अनेक वेळा पाहिला आहे. हे सर्व पाहून इथे राहण्याचा माझा निर्णय अगदी बरोबर आहे, असे वाटते.

सीझर म्हणतात, लहान जागेमुळे इथे सर्वकाही व्यवस्थित ठेवावे लागते. ते गमतीने म्हणतात, माझी मैत्रीण असती तर कदाचित आमचा वेळ भांडण्यात गेला असता. कारण एक छोटीशी जागाही स्वच्छ नसती तर तिचं मन नक्कीच अस्वस्थ झालं असतं. हे घर आता विकले जाणार अहे, पण आपल्याला अजूनही इथेच राहता येईल, अशी सीझरला आशा आहे. ते म्हणतात, हे घर लहान आहे. पण आपल्यासाठी अगदी परिपूर्ण आहे. घरमालक निक मिन्स म्हणतात, एका खरेदीदाराने या घराच्या खरेदीत रस दाखवला आहे.

## प्रबोधन, केबीसी स्टाईल!




केबीसी म्हणजेच 'कौन बनेगा करोडपती' हा शो लागतो तेव्हा त्याचे चाहते टीव्ही स्क्रीनसमोरून हलत नाहीत. अमिताभ बच्चन हॉट सीटवर बसलेल्या स्पर्धकाला प्रश्न विचारतात आणि नंतर त्या प्रश्नासाठी ४ पर्याय देतात तेव्हा प्रेक्षकही योग्य उत्तर शोधण्यासाठी विचार करू लागतात. अलिकडेच दिल्लीतील एका ऑटो रिक्षाचा फोटो व्हायरल झाला आहे. या ऑटोच्या मागे केबीसीसारखेच ४ पर्याय दिले आहेत. उत्तरे प्रश्नाइतकीच मनोरंजक आहेत. ती वाचून तुम्हाला हसायलाही येईल आणि आश्चर्यही वाटेल.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म रेडिटवर एक ग्रुप आहे. त्यात लोक दिल्लीशी संबंधित मजेदार पोस्ट शेअर करतात. काही दिवसांपूर्वी एका यूजरने रिक्षाचा फोटो पोस्ट केला होता. ऑटो रिक्षाचा पूर्ण नंबर दिसत नसला तरी तो दिल्लीचा असल्याचे स्पष्ट दिसते. व्हायरल फोटोमध्ये ऑटो रिक्षाचा मागचा भाग दिसतो. त्यावर एक प्रश्न लिहीला आहे. ट्रॅफिकमध्ये हॉर्न वाजवल्यावर काय होते? यानंतर ४ पर्यायदेखील दिले आहेत अ) सिग्नल लवकर हिरवा होतो ब) रस्ता रुंद होतो क) गाडी उडू लागते ड) काहीही नाही. त्या व्यक्तीने ट्रॅफिक सिग्नल लाल असताना किंवा जॅम असतानाही हॉर्न वाजवणाऱ्या लोकांना असा टोमणा मारला आहे.

## फॉलोअर्स वाढवा, मोफत जेवा

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी रेस्टॉरंट मालक वेगवेगळ्या युक्त्या लढवतात. कोणी सवलती जाहीर करतं तर कोणी काही वस्तू दिल्यावर एखादा पदार्थ मोफत खिलवतात. पण इटलीतलं एक




रेस्टॉरंट अनोखं आहे. इथे येऊन रेस्टॉरंटचे फोटो इंस्टाग्रामवर अपलोड करणाऱ्या ग्राहकांना मोफत जेवण दिलं जातं. सोशल मीडिया हे सध्याच्या काळातलं प्रसिद्धीचं सर्वात प्रभावी माध्यम आहे. याच माध्यमाचा वापर करून या रेस्टॉरंटला प्रसिद्धी मिळवायची आहे. हे रेस्टॉरंट इटलीतल्या मिलान शहरात आहे. 'धीस इज नॉट अ सुशी बार' असं या रेस्टॉरंटचं नाव आहे. हे जपानी रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटमध्ये मोफत जेवण्याआधी इथे एखादी डिश ऑर्डर करावी लागेल. मग या डिशचा फोटो काढून 'धीस इज नॉट अ सुशी बार' या हॅशटॅगअंतर्गत पोस्ट करावा लागतो. मग युजर्सच्या फॉलोअर्सच्या संख्येनुसार मोफत जेवण देण्याचा निर्णय घेतला जातो. एक ते पाच हजार फॉलोअर्स असणाऱ्यांना एक प्लेट सुशी किंवा साशिमी मोफत दिलं जातं. पाच ते दहा हजार फॉलोअर्स असतील तर दोन प्लेट जेवण मोफत दिलं जातं. इन्स्टाग्रामवर फॉलोअर्स वाढवले तर तुम्हाला मोफत जेवण मिळू शकतं, असा हा फंडा आहे.

## गाव बनलं अस्वलांचा अड्डा



हवामान बदल, बेसुमार जंगलतोड यांचे परिणाम आता दिसू लागले आहेत. जंगलांलगत शहरं उभारल्यामुळे रानटी पशू मानवी वस्तीत येऊ लागले आहेत. अशीच एक घटना रशियामध्ये घडली. रशियातल्या बर्फाच्छादित चुकोटका या गावात ध्रुवीय अस्वलं घुसली आहेत. जवळपास ५६ ध्रुवीय अस्वलांनी या गावात आसरा घेतला आहे. यामुळे गावातले सात हजार लोक घरांमध्ये बंदिस्त झाले आहेत. अस्वलांच्या हल्ल्याच्या भीतीने कोणीही घराबाहेर पडायला तयार नाही. इथली मुलंही शाळेत जात नाहीत. याआधीही या गावात ध्रुवीय अस्वलं आली होती. रशियन माध्यमांनीही या प्रश्नाला महत्त्व दिलं आहे. ध्रुवीय अस्वलं माणसांवर हल्ला करू शकतात. त्यांचं वजन जवळपास ६०० किलो असतं. ही अस्वलं ४० किलोमीटर प्रतीतास एवढ्या वेगाने धावू शकतात. ध्रुवीय अस्वलं ही संरक्षित प्रजाती आहे. त्यामुळे त्यांना मारता येत नाही. या अस्वलांना मारणं बेकायदेशीर असल्यामुळे लोकांपुढे घरात बसण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. उन्हाळ्यात बर्फ वितळू लागल्यानंतर ध्रुवीय अस्वलं मानवी वस्तीत प्रवेश करतात. प्राणी आणि माणूस यांच्यातला संघर्ष नवा नाही. याच कारणामुळे जागतिक तापमानवाढीवर उपाय करणं गरजेचं आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या गाड्यांमध्ये पाणी?

काही पेट्रोल पंपावर इंधन भरल्यावर वाहनांचे अॅव्हरेज कमी येते, अशा तक्रारी अनेकदा ऐकायला मिळतात. काही वेळा पेट्रोल पंपावरील पेट्रोल किंवा डिझेलमध्ये पाण्याचा अंश असल्याच्या तक्रारी असतात. आता चक्क मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील इनोव्हा कारमध्ये पेट्रोल पंपावर इंधनाऐवजी पाणी भरल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार मध्य प्रदेशात घडला.



भाजप नेते आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ इनोव्हा गाड्या डिझेल भरण्यासाठी रतलाम जिल्ह्यातील ढोसी गावातील भारत पेट्रोल पंपावर गेल्या होत्या; मात्र त्यानंतर काही वेळातच या गाड्या बंद पडल्याने ही घटना उघडकीस आली. यादव यांचा ताफा रतलाम येथे 'एमपी राईज २०२५ कॉन्क्लेव्ह'साठी आला होता.

मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्या अचानक बंद पडल्याने प्रशासकीय अधिकारी व पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर कारमधील डिझेलच्या टाकीत पाणी आढळून आल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या. त्यामुळे, पेट्रोल पंपावरच गाड्यांचे इंधन टँक उघडून तपासणी करण्यात आली. दरम्यान इंदूरवरून दुसऱ्या गाड्या मागवून मुख्यमंत्र्यांचा ताफा पुढे नेण्यात आला. या घटनेनंतर प्रशासनाने ढोसी गावातील हा पेट्रोल पंप सील केला असून पुढील तपास आणि चौकशी करण्यात येत आहे. इंधन टँक उघडण्यात आले त्या वेळी या टँकमध्ये २० लिटर डिझेलमध्ये १० लिटर पाणी असल्याचे निष्पन्न झाले. विशेष म्हणजे सर्वच गाड्यांची हीच अवस्था होती. एका ट्रकमध्ये २०० लिटर डिझेल टाकले होते. तो ट्रकही काही वेळानंतर रस्त्यावरच बंद पडला. पावसाच्या पाण्यामुळे टाकीत पाणी गेल्याची सारवासारव तेथील कर्मचाऱ्यांनी केली.

## उंटांचं रुग्णालय

प्राण्यांसाठीही रुग्णालयं असतात. प्राण्यांवर शस्त्रक्रियाही केल्या जातात. सर्वसाधारणपणे सर्व प्राण्यांवर एकाच ठिकाणी उपचार होतात. मात्र दुबईमधलं एक रुग्णालय खूपच अनोखं आहे. या रुग्णालयात फक्त उंटांवर उपचार केले जातात. हे रुग्णालय खास उंटांसाठीच तयार करण्यात आलं आहे. 'दुबई कॅमल हॉस्पिटल' या नावाने ते ओळखलं जातं. दुबई हा आखाती देश. या भागात वाळवंट असल्यामुळे वाहतुकीसाठी उंटांचा वापर होतो. हे रुग्णालय उभारण्यासाठी भारतीय चलनात सुमारे ७१ कोटी रुपये खर्च झाले आहेत. हे रुग्णालय २०१७ मध्ये सुरू झालं होतं. उंटांसाठीचं हे खास रुग्णालय आता जगभर प्रसिद्ध झालं आहे. या रुग्णालयात संयुक्त अरब अमिरातीतून उंट आणले जातात. इथे ६५ कर्मचारी आहेत. त्यात परदेशी तज्ज्ञांचाही समावेश आहे. या ठिकाणी एकाच वेळी २२ उंटांवर उपचार करण्याची सोय आहे. उंटांवर उपचार करण्यासाठी बरेच पैसे




आकारले जातात. अल्ट्रासाउंड चाचणीसाठी आठ हजार रुपये आकारले जातात तर साध्या शस्त्रक्रियेसाठी ७० हजार रुपये घेतले जातात. या ठिकाणी पाच मीटर उंचीचं एंडोस्कोपी मशीन आहे. जगभरात अशी फक्त तीन एंडोस्कोपी मशीन्स आहेत. यापैकी दोन अमेरिकेत आहेत. हाड मोडलेल्या उंटांना इथे आणलं जातं. संयुक्त अरब अमिरातीत उंटांच्या मॅरेथॉनचं आयोजन केलं जातं. या दरम्यान उंटांना दुखापती होतात. अशा उंटांना इथे आणलं जातं.

## विमानातील 'पाहुण्या'मुळे पळापळ



अहमदाबाद विमान अपघातानंतर लोकांच्या मनात आता विमान प्रवासाची भीती निर्माण झाली आहे. गेल्या महिन्याभरात घडलेल्या अनेक घटनांमुळे हवाई प्रवास आता सुरक्षित राहिला आहे की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आता विमानात बसतानादेखील प्रवाशांच्या मनात एक भीती असते, किंवा काही गडबड दिसली तरी प्रवशांमध्ये गोंधळ निर्माण होतो. असेच काहीसे एका विमान प्रवासादरम्यान घडले.

विमान उड्डाण घेणारच होते तोच एक गोंधळ सुरू झाला. प्रवासी आपले सीट सोडून इकडे तिकडे पळू लागले. ही घटना घडली आहे ऑस्ट्रेलियात. ऑस्ट्रेलियामध्ये एका देशांतर्गत विमानात सर्व प्रवासी विमानात बसले होते आणि ते विमानाच्या उड्डाणाची वाट पाहत होते. दरम्यान विमानात एक प्रवासी सामानाच्या केबिनमध्ये त्याचे सामान ठेवत होता. त्याचदरम्यान, त्याला तिथे काहीतरी विचित्र हालचाल होताना दिसली. त्याने जवळ जाऊन पाहिले आणि तो घाबरला आणि संपूर्ण विमानात गोंधळ उडाला.




व्हर्जिन ऑस्ट्रेलियाचे ब्रिस्बेनला जाणारे विमान व्हीए ३३७ प्रवाशांना घेऊन उड्डाण करण्याच्या तयारीत होते. तेवढ्यात एका प्रवाशाला केबीनमध्ये सामान ठेवताना चक्क साप दिसला. त्याला पाहून सर्व प्रवासी घाबरले. दरम्यान सर्पमित्र मार्क पेली यांना याची माहिती मिळताच ते तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी सांगितले, हा सुमारे दोन फूट लांबीचा हिरवा साप होता. तो विषारी नव्हता.

विमान कंपनीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, सापामुळे विमान उड्डाणाला सुमारे दोन तास उशीर झाला. पेले यांच्या मते तो प्रवाशांच्या सामानातून आला असावा. व्हर्जिन ऑस्ट्रेलियाने एका निवेदनात म्हटले, प्रवाशांची सुरक्षा ही त्यांची प्राथमिकता आहे आणि म्हणूनच त्यांनी साप दिसल्यानंतर लगेच उड्डाण थांबवले आणि आवश्यक ती सर्व पावले उचलली. प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल त्यांनी माफीही मागितली.

ऑस्ट्रेलियातील घरांमध्ये साप आढळण्याच्या घटना नवीन नाहीत. ऑस्ट्रेलिया हे जगातील सर्वात विषारी सापांचे घर असल्याचे म्हटले जाते. या वेळी सापडलेला साप विषारी नसला तरी विमानात साप सापडणे हे नक्कीच विचित्र वाटण्यासारखे आहे.

## तो बनला भूभागाचा राजा




जगातली काही ठिकाणं 'नो मेन्स लँड' म्हणून ओळखली जातात. दोन देशांच्या सीमेलगतच्या भागाला 'नो मेन्स लँड' म्हटलं जातं. या भागावर कोणाचाही अधिकार नसतो. म्हणूनच जगातली कोणतीही व्यक्ती अशा ठिकाणांवर अधिकार गाजवू शकते. आफ्रिकेतही असंच एक ठिकाण आहे. या जागेवर कोणाचाही अधिकार नाही. इथल्या वाळवंटी, कोरड्या ठणठणीत जमिनीवर कोणालाही हक्क गाजवायचा नाही. मात्र जगभ्रमंती करणारे काही अवलिये या ठिकाणी येतात आणि स्वत:ला प्रदेशाचा राजा घोषित करून टाकतात. आफ्रिकेतलं हे ठिकाण बीर ताविल म्हणून ओळखलं जातं. २०६० चौरस किलोमीटरचा हा भूभाग सर्वांनाच नकोसा झाला आहे. हा भूभाग इजिप्त आणि सूदान या दोन देशांच्या सीमारेषेलगत आहे. पण त्यावर दोन्हीपैकी एकाही देशाचा अधिकार नाही. इथल्या जमिनीवर गवताचं पातंही दिसत नाही. रखरखीत अशी ही जमीन सर्वांनाच नकोशी झाली आहे. २०१४ मध्ये अमेरिकेतला एक शेतकरी इथे आला होता. त्याने या भूभागावर एक झेंडा फडकवला आणि स्वत:ला उत्तर सूदानचा राष्ट्रपती घोषीत करून टाकलं. यानंतर २०१७ मध्ये एक भारतीय तरुण या ठिकाणी पोहोचला. सुयश दीक्षित असं त्याचं नाव. मध्य प्रदेशमधल्या सुयश दीक्षितला भटकंती करायला खूप आवडतं. त्याने या भूभागाला 'किंग्डम ऑफ दीक्षित' हे नाव दिलं. त्याने वेगळा झेंडाही तयार केला. वडिलांना इथल्या पंतप्रधानपदी नेमलं. या वाळवंटी प्रदेशात पालीच आढळतात. त्यामुळे या पालीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्याचा निर्णयही सुयशने घेतला होता.

# आयुक्त साहेब, कुत्र्यांचा बंदोबस्त करा, कोणाचा जीव जाण्याची वाट पाहू नका

नगर – सध्या अहिल्यानगर, सावेडी उपनगरामध्ये मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून नागरिकांना पहाटेचे वेळेस फिरण्यास जाणे म्हणजे जीवितास धोका पोहचवणे आहे. यासाठी कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी श्रीनिवास बोज्ञा यांनी केली आहे.


श्रीनिवास बोज्ञा

सावेडी उपनगरामध्ये गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड व तपोवन रोड या भागात मोठया प्रमाणात मोकाट कुत्रे टोळीने फिरत असतांना दिसतात व एकटा दुकटा माणूस किंवा मुले दिसले की ही कुत्रे झुंडीने त्याच्यावर धावून जातात व त्यामध्ये जखमी झाल्याचे प्रकारही मोठ्या प्रमाणात घडत आहे. या बाबत अहिल्यानगर महानगरपालीकेत चौकशी केली असता कुत्र्यांना पकडण्यासाठी कोणतीही यंत्रणाच उपलब्ध नसल्याचे समजले असून ही बाब अतिशय गंभीर आहे. साधे एखादे जनावर रस्त्यावर मरून पडले तरी पालिकेचे कर्मचारी उचलून नेत नाही. या बाबत विचाराणा केली असता ते आमचे काम नाही असे कर्मचारी सांगतात व या बाबत अधिकाऱ्याकडे विचारणी केली असता एखादा खाजगी माणसाला पाठवून काम करून घेतो आमच्याकडे या बाबत कोणतीही सुविधा नाही, असे बेजबाबदार पणे सांगितले जाते. ही पण बाब अतिशय गंभीर असून या बाबत प्रशासनाने ठोस भूमिका घेणे गरजेचे आहे.

उपनगरामध्ये पहाटेचे वेळेस अनेक वृद्ध फिरायला निघतात तसेच अनेक शाळेतील विद्यार्थी व कॉलेज मधील विदयार्थी, मुले, मुली क्लास व शाळेत जाण्यासाठी सायकल वर जातात अश्या वेळी ही मोकाट कुत्रे त्यांच्यावर धावून जातात व अश्या घटनेत नक्कीच एखाद्याचा जीवितास धोका होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, प्रशासनाने कोणाचा जीव जाण्याची वाट न पाहता त्वरित या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी श्रीनिवास बोज्ञा यांनी केली आहे.

# मनपा आयुक्तांच्या दालनात १७ जुलै रोजी कुत्रे सोडणार

## आंदोलनाला पोलीस बंदोबस्त मिळावा



नगर – मोकाट व पिसाळलेले कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असल्याने अनेक वेळा तोंडी व लेखी तक्रारी केल्या असून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांच्या मार्गदर्शनाखाली मुकुंदनगर, फकीरवाडा परिसरातील नागरिकांच्या वतीने मनपा आयुक्त यांना निवेदन देण्यात आले होते. मात्र या निवेदनाची अद्यापही दखल घेतली गेली नसून १७ जुलैला मनपा आयुक्तांच्या दालनात कुत्रे सोडणार आहे. सदर आंदोलन चिघळल्याने महानगरपालिकेचे कर्मचारी व कुत्र्याचे ठेकेदार हे मिळून आंदोलकांवर किंवा कुत्र्यांवर हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या आंदोलनास पोलीस संरक्षण देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षक कार्यालय व तोफखाना पोलीस स्टेशन येथे करण्यात आली आहे.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, मुकुंदनगर परिसरात विविध ठिकाणी मोकाट कुत्रे धुमाकूळ घालत असून सकाळच्या वेळी लहान मुले शाळेत जाताना त्यांच्यावर भुंकून हल्ला करतात तसेच महिला व वृद्धांना सुद्धा या कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. मुकुंदनगर परिसरात विविध ठिकाणी नेहमीच कुत्रा चावण्याची घटना घडत आहे. मनपा प्रशासनाने या बाबीची दखल घेऊन मोकाट व पिसाळलेले कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.


एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी अंतर्गत झालेल्या नॅशनल लेवल स्पर्धेमध्ये कविताज् टु टोरिअलच्या मुलांनी यश मिळवल्याबद्दल क्लासच्या संचालिका कविता तरोटे यांना सन्मानित करण्यात आले.

# नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेत कविताज् टुटोरिअलचे यश

नगर – एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी अंतर्गत झालेल्या नॅशनल लेवल स्पर्धेमध्ये कविताज् टिटोरिअलच्या मुलांनी यश मिळवले. क्लासच्या संचालिका कविता तरोटे यांना यावर्षीचा बेस्ट टीचर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. याबद्दल त्यांनी पालक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

या स्पर्धेत देशातील १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये छोट्या गटात दुसरीतील वेदा सागर हिने ५ मिनिटात १३५ उदाहरणे व मोठ्या गटात अयान शेख याने १४५ उदाहरणे सोडवून चॅम्पियन ट्रॉफी पटकावली.

नक्षत्रा गाली, साहेबा पठाण, अद्रिका मासाळकर, ओम तरोटे, अवनिश गारळकर, अर्निका दिकोंडा, आरोही दिकोंडा, अद्रिका खंडेलवाल आणि ओम कांबळे हे विद्यार्थी पहिल्या १० रँक मध्ये आले आहेत. सलग ३ वर्ष चॅम्पियन ट्रॉफी कविताज् टिटोरिअलची मुले मिळवत आली आहेत. नवीन वर्षाचे ॲडमिशन सुरु झाल्याचे सांगितले. ९८२३०३३९२७/८६६८८६८७२६ या नंबरवर संपर्क करायचे आवाहन करण्यात आले.

# पुणे-अहिल्यानगर नव्या रेल्वे प्रकल्पाचे स्वागत; मात्र दौंड मार्गे इंटरसिटी रेल्वे तातडीने सुरू करावी

नगर – अनेक वर्षांपासून प्रवासी, सामाजिक संस्था आणि विविध संघटनांकडून अहिल्यानगर ते पुणे इंटरसिटी रेल्वे सुरू करण्याची मागणी केली जात असतानाही, अद्यापही ही सेवा सुरू करण्यात आलेली नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे मत सौ. स्वाती सिरसुल यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी सांगितले की, सध्या जाहीर झालेल्या पुणे–अहिल्यानगर या नवीन रेल्वे प्रकल्पाचे स्वागत आहे, परंतु या प्रकल्पाला प्रत्यक्षात पूर्णत्वास अनेक वर्षांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे तातडीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी अहिल्यानगर ते पुणे व्हाया दौंड इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे.


सौ. स्वाती सिरसुल

दररोज हजारो प्रवासी अहिल्यानगर ते पुणे या मार्गावर प्रवास करतात. शिक्रापूर, सणसवाडी, वाघोली, हडपसर बायपास आणि पुणे शहरातील विविध चौकांमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे १२० किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी चार ते पाच तास लागतात. त्यामुळे प्रवाशांना वेळेचा आणि इंधनाचा अपव्यय सहन करावा लागतो. व्यापारी, विद्यार्थी आणि नोकरदार वर्ग या कारणांमुळे प्रचंड त्रास सहन करत असून अनेक वेळा पुणे जाण्याची इच्छा असूनही वाहतूक कोंडीमुळे प्रवास टाळावा लागतो. ही समस्या लक्षात घेऊन तातडीने दौंड मार्गे रेल्वे सेवा सुरू करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

स्वाती सिरसुल यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, दौंड जंक्शन जवळील कोडलाईन आधीपासूनच अस्तित्वात असताना आणि त्या मार्गावर रेल्वे वाहतुकीसाठी आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध असूनही, आजपर्यंत अहिल्यानगर–पुणे इंटरसिटी सेवा सुरू का करण्यात आलेली नाही? याबाबत रेल्वे प्रशासनाने आजवर कोणताही खुलासा का केलेला नाही? या बाबत सामान्य प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी असून या मागणीला आता अधिक वेळ दिरंगाई न करता तातडीने प्रतिसाद देणे गरजेचे आहे.

नवीन रेल्वे प्रकल्प हा केडगाव, सुपा, शिरूर, रांजणगाव, शिक्रापूर, वाघोलीमार्गे पुण्याशी जोडणारा असून सुमारे ११६ किलोमीटर लांबीचा आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ११,००० कोटी खर्च अपेक्षित असून डीपीआर रेल्वे बोर्डाने मंजूर केला आहे, ही बाब आनंददायी असली तरी प्रत्यक्षात जमीन संपादन, रुळ टाकणे, स्टेशन उभारणी यासारख्या कामांसाठी अनेक वर्षे लागणार आहेत. त्यामुळे नगरवासीयांसाठी तातडीचा आणि वास्तववादी पर्याय म्हणून दौंड मार्गे रेल्वे सेवा सुरू करणे हाच योग्य मार्ग असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या पार्श्वभूमीवर राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधींनी, सामाजिक संघटनांनी आणि नागरिकांनी एकत्र येऊन अहिल्यानगर ते पुणे इंटरसिटी रेल्वे सेवा तातडीने सुरू व्हावी यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी स्वाती सिरसुल यांनी केली आहे.


आडसूळ कॅम्पसमध्ये डॉ. प्रदीप एम. पाटील व डॉ. संभाजी पठारे यांचा गुरुपौर्णिमेनिमित्त सन्मान करताना संस्थेचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध आडसूळ.

# श्रवण शिंदे यास शिष्यवृत्ती ब्ल्यू डायमंड अकॅडमीची शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तुंग भरारी

नगर – शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षात ब्लू डायमंड अकॅडमी स्कूलचे इ.८ वी मधील १३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत प्रविष्ट झाले होते, त्यातील ४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले.




इयत्ता ५वी मधील २६ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत प्रविष्ट झाले होते. त्यातील ९ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले.

इ. ५ वी तील श्रवण सुनील शिंदे यास परीक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त झाली स्कूलचे प्राचार्य व उपप्राचार्या यांनी त्याचा सन्मान करून कौतुक केले.

# अहिल्यानगर मनपातील रस्त्यांच्या कामात घोटाळा

## मुख्यमंत्र्यांना पाठवली फाईल, गुन्हे दाखल करा, भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगात टाका

मुंबई – अहिल्यानगर महानगरपालिकेत भ्रष्टाचार संदर्भात मुख्यमंत्री, अँटी करप्शनकडे, जिल्ह्यातील या संदर्भातील संबंधित अधिकाऱ्यांकडे मागील दोन वर्षांपासून तक्रार, पाठपुरावा करत आहेत. अहिल्यानगरमध्ये रस्ते जागेवर नाहीत. रस्ते शोधावे लागतात. नागरी सुविधा नाहीत. रस्त्यांच्या या कामामुळे जनतेचे पावसाळ्यात प्रचंड हाल सुरू आहेत. प्रशासक, ठेकेदार आणि लोकप्रतिनिधी यांच्या संगनमतातून अहिल्यानगरची महानगरपालिका हे या महाराष्ट्रातील दरोडेखोरीच एक उत्तम नमुना आहे. त्याची चौकशी व्हावी यासाठी शहर प्रमुख किरण काळे यांनी निवेदने दिली, तक्रारी केल्या. तरी देखील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होत नाही. म्हणून मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पुराव्यांसह या स्कॅमची फाईल पाठवली आहे. जर मुख्यमंत्री अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारींवर कारवाया करत नसतील तर शिवसेना त्यांना सोडणार नाही. त्यांची जागा तुरुंगातच आहे. ज्या अहिल्यानगरमध्ये हा भ्रष्टाचार झाला आहे. तेथील आताचे आमदार, माजी महापौर, नगरसेवक हे सगळे तुमच्या महायुतीत आहेत. मग हा सुद्धा जन सुरक्षेचा मुद्दा नाही का, असा सवाल खा. संजय राऊत यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना केला आहे.


खा. संजय राऊत

या संदर्भात काळे यांनी मंगळवारी मुंबईत खा. राऊत यांची समक्ष भेट घेत या संदर्भातील पुराव्यांची फाईल त्यांना दिली होती. त्यानंतर राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहित ती फाईलच सरकारला दिली आहे. मुंबईत बुधवारी सकाळी प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी सरकारवर आरोप केले आहेत.

या चार वर्षां व्यतिरिक्त सन २०२० ते २०२३ या कालावधीत देखील अशाच प्रकारच्या मोड ऑफ ऑपरेंडस – कार्यप्रणालीच्या माध्यमातून सुमारे २०० ते ३०० कोटी रुपयांच्या तितक्याच रकमेचा घोटाळा झाला असण्याची दाट शक्यता असल्याचे राऊत यांनी पत्रात म्हटले आहे. याबाबत देखील तक्रार करूनही कोणतीही चौकशी जाणीवपूर्वक भ्रष्टाचार दडपण्याच्या हेतूने करण्यात आलेली नाही.

अहिल्यानगर शहराचे नागरिक रस्त्यांच्या समस्येमुळे मेटाकुटीला आले आहेत. सरकार त्यांना रस्ते ही देऊ शकत नसेल तर अशा सत्तेचा काय उपयोग. गुन्ह्याची व्याप्ती पाहता या प्रकरणातील आरोपींची संख्या ही प्रचंड मोठी आहे. जनतेची लूट करणाऱ्या आपल्या सरकारच्या वरदहस्ताने अशा साखळी पद्धतीने भ्रष्टाचार करणाऱ्या भ्रष्टाचारांची जागा ही तुरुंगात असायला हवी, असे राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे.

अहिल्यानगरच्या जनतेच्या व्यापक जनहितार्थ आपण या तक्रारीची दखल घेत तात्काळ सर्व दोषींवर उपलब्ध चौकशी अहवालाच्या आधारे गंभीर स्वरूपाचे फौजदारी खटले दाखल करून दोषींना तात्काळ अटक करत त्यांची तुरुंगात रवानगी करावी, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे राऊत यांनी केली आहे.



नेहा बोरा–गांधी आयोजित राखी शॉपींग प्रदर्शनाच्या शुभारंभ प्रसंगी शीतलताई जगताप, अक्षता मॅडम, राखी बोरा, मनीषा बोगावत, अंशुल मुनोत, छाया मुथा, दीपाली मुथा, अलका जैन, निकिता जैन आदी.

# नेहा बोरा–गांधी आयोजित राखी शॉपी प्रदर्शनास प्रतिसाद

नगर – नगर शहरातील केशर गुलाब मंगल कार्यालयात नेहा बोरा–गांधी यांनी आयोजित केलेल्या राखी शॉपिंग फेस्टीव्हलला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या प्रदर्शनात एकूण ८५ स्टॉल्स् लावण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्‌घाटन माजी नगरसेविका सौ. शितलताई जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी आयोजक नेहा बोरा आणि राखी बोरा, महावीर ग्रुपच्या अक्षता मॅडम, लिटील फ्लॉवर शाळेच्या मनीषा बोगावत, अंशुल मुनोत, जितो सेक्रेटरी छाया मुथा, दीपाली मुथा, अलका जैन, निकिता जैन उपस्थित होते.

या प्रदर्शनातून भरपूर महिलांना प्लॅटफॉर्म मिळाला. यावेळी सौ. शितलताई जगताप यांनी सर्व महिलांना या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

# विठ्ठल आनंदाचा कंद... सर्व सुखाचे आगर...

महाराष्ट्रातील सर्व समाजातील नागरिकांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात एकदा तरी पंढरपूरच्या पायी दिंडीचा अनुभव घेऊन विठोबा चरणी नस्तमस्तक व्हावे. पायी चालत पंढरपूरची दिंडी वारी करणे म्हणजे जीवन कसे जगावे याचे आत्मज्ञान प्राप्त होते. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, सामान्य नागरिक, अबालवृद्ध विठ्ठलाच्या ओढीने चालत चालत पंढरपूरला आषाढी एकादशीला पोहोचतात आणि काही देवाचे मुखदर्शन घेतात तर काही रांगेत ८–१० तास उभे राहून पांडुरंगाच्या चरणी लीन होतात. काही फक्त कळस दर्शन घेऊन माघारी फिरतात तर काही पंढरपूरच्या मातीला पाय लागले म्हणजे पांडुरंगच भेटला या समाधानात राहतात. पायी चालणार्या कोणत्याही भक्तास काही त्रास होत नाही व त्याची काळजी विठोबाच घेतोच असा अनुभव माझ्यासह अनेकांनी घेतला आहे... म्हणूनच विठ्ठल आनंदाचा कंद... सर्व सुखाचे आगर...म्हटले तर वावगे ठरणारे नाही...

पंढरपूरचा श्रीविठ्ठल हा संतांच्या भक्तीचा आधारस्तंभ आहे. सद्गुरु श्री संत ज्ञानेश्वरांनी विठ्ठलास ज्ञानाचे रूप मानले. त्यांच्या आशीर्वादाने आणि आपले गुरु निवृत्तीनाथांच्या प्रेरणेने त्यांनी ज्ञानेश्वरी लिहिली. जगदगुरू संत तुकाराम महाराज व संत नामदेव महाराज यांनी विठ्ठलाला मुक्तीचा मार्ग मानले आहे. विठ्ठलाच्या भक्तीसाठी पंढरपूर पायी वारी अतिशय महत्त्वाची आहे. सुमारे आठशे वर्षांपूर्वीपासूनची वारीची परंपरा आहे....

यंदाची २०२५ मध्ये संपन्न झालेली आषाढी पंढरपूर वारी ही एक वैशिष्ट्यपूर्ण वारी मानली पाहिजे. शासनाच्या आरोग्य, निवारा, अन्न, पाणी वाहतूक व्यवस्था या सर्व सोयींसह वारकर्यांची केलेली व्यवस्था ही कौतुकास्पद ठरली. यावर्षी सुमारे २५ ते २७ लाख वारकरी पंढरपुरामध्ये आषाढी एकादशीच्यानिमित्ताने दाखल झाले होते. आरोग्याच्या बाबतीत उत्कृष्ट नियोजन सर्वत्र होते. महाराष्ट्र राज्यातून अनेक गावे त्याचप्रमाणे तालुका व जिल्हा स्तरातून पंढरीतील विठ्ठलाच्या दर्शनासाठी अनेक पायी दिंड्या निघतात. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी श्रीक्षेत्र आळंदीहून निघते. या पालखी पायी दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे भाग्य माझी धर्मपत्नी सौ. शारदा देशपांडे यांच्या आग्रहाने सहपत्नीक मला लाभले, हे मी माझे भाग्य समजतो. संगमनेर येथील ह.भ.प.बद्रीनारायण मुरलीधर भंडारी यांनी सुमारे ४७ वर्षापासून श्रीक्षेत्र आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर असा माहेश्वरी पदयात्रा दिंडी सोहळा सुरू केला आहे. २०२५ हे वर्ष या दिंडीचे ४८ वे वर्ष होते. हभप बद्रीनारायणजी यांचे ८७ वर्षाचे वय असून तेही या दिंडीत सहभागी झाले होते. त्यांचे चिरंजीव हभप केदारनाथ भंडारी व सूनबाई शोभना भंडारी हे या दिंडीचे संपूर्ण नियोजन शिस्तबद्ध व सर्व सोयीने युक्त करीत होते. महाराष्ट्रातील सर्व समाजातील नागरिकांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात एकदा तरी पंढरपूरच्या पायी दिंडीचा अनुभव घेऊन विठोबा चरणी नस्तमस्तक व्हावे. पायी चालत पंढरपूरची दिंडी वारी करणे म्हणजे जीवन कसे जगावे याचे आत्मज्ञान प्राप्त होते. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, सामान्य नागरिक, अबालवृद्ध विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी चालत पंढरपूरला आषाढी एकादशीला पोहोचतात. चालणाऱ्या कोणत्याही भक्तास काही त्रास होत नाही. त्याची काळजी विठोबा घेतोच, असा अनुभव माझ्यासह अनेकांनी घेतला आहे. काही दुर्घटना या मानवनिर्मित झालेल्या आहेत. पंढरपूरच्या वारीचे महत्त्व संत एकनाथ महाराजांनी सांगितलेले आहे. ते म्हणतात... वाराणसीसी जाय एक मास, गोदावरी एक दिन, पंढरीसी एक पाऊल सारखेची... वाराणसीला एक महिना राहण्याचे पुण्य, गोदावरी–गंगेमध्ये एक दिवसाच्या स्नानाचे पुण्य, परंतु पंढरीत एक पाऊल टाकल्याचे पुण्य सारखेच आहे. म्हणूनच पंढरीची पायी वारी ही सर्वश्रेष्ठ आहे. विमानाने तिरुपती बालाजीला अनेक वेळा जाऊन दर्शन घेऊन आलो. राहण्याची फाईव स्टार व्यवस्था. परिसरातील देवदर्शनासाठी लक्झरी गाडी, जेवणाची उत्तम व्यवस्था अशी यात्रा करून आलो, असे अभिमानाने सांगणारे श्रीमंत बालाजीचे श्रीमंत भक्त. त्याचप्रमाणे चारीधाम यात्रा आरामदायी ट्रॅव्हल एजन्सीद्वारा केली, काही त्रास झाला नाही. फक्त इतके रुपये खर्च झाले, पण शीण आला नाही, असेही सांगणारे यात्रेकरू आपण सर्वांनी पाहिले आहे. अशी यात्रा आपणही केली असेल. परंतु पंढरपूरच्या पायी दिंडीचा अनुभव हा जीवन जगण्याचा मार्ग दाखवतो. २१ दिवसाचा २९० किलोमीटर प्रवास करून चंद्रभागेतील स्नान, विठ्ठलाचे चरण स्पर्श नव्हे तर मंदिर कळसाचे दर्शन झाले तरी परमानंद मिळतो. त्याचे वर्णन संत एकनाथ महाराज यांनी केले आहे... धन्य आजी दिन... संत दर्शनाचा...अनंत जन्माचा क्षण गेला... मज वाटे त्यासी आलिंगन द्यावे... कदा न सोडावे चरण त्याचे... त्रिविध तापाचं झालं बोलवणं...देखील चरण वैष्णवांचे...एका जनार्दनी घडो त्याचा संग... न व्हावा वियोग जन्मोजन्मी....

पायी दिंडी वारी करून विठ्ठलाचे दर्शन घेणे हे सर्वांच्याच नशिबी नसते. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा हा राज्याचा एक सांस्कृतिक व धार्मिक सोहळा मानला जातो. आळंदीहून निघालेली ही पालखी पुणे, सासवड, जेजुरी, वाल्हे, निरा, लोणंद, जळगाव, फलटण, बरड, माळशिरस, भंडी शेगाव व वाखरी या मार्गे मुक्काम करत पंढरपूरला जाते. ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीमागे नोंदणीकृत क्रमांकाच्या सुमारे ४०० पेक्षा जास्त दिंड्या असतात तर पुढे मानाच्या दिंड्या चालत असतात. माऊली पालखी सोहळ्यात समावेश असलेल्या दिंड्या या आनंदी मार्गी पंढरपूरपर्यंत मार्गावर ज्ञानोबा–तुकोबा नावाचा गजर व अभंग गात चालत असतात. या अफाट गर्दीत वारकऱ्यांसमवेत सामान घेऊन जाणारी चारचाकी वाहने यांचाही समावेश असतो. वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून अहोरात्र कष्ट करणारे पोलिस सतत वारकऱ्यांबरोबर कार्यरत असलेले दिसतात. त्यांच्या मुखीही माऊलीचा गोड आवाज वारकऱ्यांना मार्गदर्शन करताना ऐकू येतो. राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यातील पंढरपूर मार्गावरील रोडवर शौचालय, पाणी, आरोग्य, निवारा यांचे नियोजन खूपच व्यवस्थित व शिस्तबद्ध केलेले दिसत होते. माऊलीच्या मुक्कामी गावी रोडवर ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकर, वैद्यकीय सेवा, निवारा याचे नियोजन शिस्तबद्ध होते. अनेक सेवाभावी संघटना वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार देताना सर्वत्र दिसत होते. अन्नदान अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात केले जात होते. अशा या पायी दिंडी सोहळ्यात कष्टकरी ते एसीमध्ये राहणार्या वारकऱ्यांचा समावेश होता. छत्रपती संभाजीनगर येथे स्वतःचा पाच रुमचा पॉश बंगला, बेडरूममध्ये स्वच्छ संडास–बाथरूम, वातानुकूलित यंत्र, घरातील फरशी पायाला गार लागेल म्हणून पायात गरम चप्पल घालणारी गृहिणी, घरात डास येऊ नये म्हणून प्रत्येक रुममध्ये गुड नाईटची मशीन, किचनमध्ये डायनिंग टेबल, सर्व रुम सुगंधित राहाव्यात म्हणून नियमित रुम फ्रेशनर मारणारे, भाजी किंवा दळण आणण्यासाठी पायी न जाता दुचाकी वाहन घेऊन जाणारे, बाहेरगावी मुलांकडे किंवा पाहुण्यांकडे जाताना महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसने प्रवास न करता स्वतःच्या कारने प्रवास करणारे...अशा सर्व सुखसुविधा लाभ घेत असलेले अनेकजण वारीमध्ये होते. सेवानिवृत्त स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखा अधिकारी धनंजय देशपांडे, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या क्लासवन अधिकारी व काही काळ हायकोर्ट प्रॅक्टिस करीत असलेल्या श्रीमती देशपांडे हे दाम्पत्य सत्तरीच्या आसपास असूनही माहेश्वरी पायी दिंडी सोहळ्यात सहभागी झाले होते. आळंदी ते पंढरपूर या प्रवासात अनेक ठिकाणी राहुट्यांमध्ये रात्रीचा मुक्काम तर कधी शाळेतील वर्गात, कधी वर्गाबाहेरच्या पडवीत. सकाळी टँकरच्या बदलीभर गार पाण्याच्या आंघोळीला नंबर लावून, चहा–नाश्ता, त्याचप्रमाणे जेवण, सार्वजनिक संडासचा वापर, आंघोळीचे कपडे मुक्कामी ठिकाणी दोरे बांधून वाळवण्याची धडपड तर उशिरा झोपून लवकर पहाटे आंघोळ करण्यासाठी करावी लागणारी धावपळ. हे सर्व करत असताना होणारा त्रास सहन करूनही दिंडीचा आनंद घेणारे देशपांडे आजी–आजोबा हसत खेळत, अभंग गात, टाळ वाजवत पंढरपूर यात्रेत सहभागी होऊन विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होऊन कृतार्थ झाल्याचा आनंद व्यक्त करताना दिसले. राहुटीमध्ये पावसाचे पाणी वाहत आहे, जवळच सार्वजनिक शौचालयाची गाडी कुठे तरी आहे, मागे पाण्याचा टँकर. तरीही चालून पाय थकल्याने अशाही वातावरणात सुखाची शांत झोप लागते यापेक्षा मोठे सुख कोणते असते. श्रीमंतांना झोप येण्यासाठी औषध घ्यावे लागते. त्यापेक्षा आपण भाग्यवान आहोत. विठ्ठलाचा गजर करत सर्वच सुखाची झोप घेत आहोत, असे सुखदायी विचार कॉम्प्युटर इंजिनियर असलेल्या व आयटीमध्ये १२ लाखाचे पॅकेज असलेल्या पियुष कुलकर्णी यांनी व्यक्त केले. पोलिस खात्यात ४० वर्षे सेवा केलेले सुरेश मैड हे सेवानिवृत्त पीएसआय. पोलिसी रुबाबात जीवन जगणारे मैड यांनी सपत्नीक पायी दिंडीत सहभागी होऊन गळ्यात टाळ–मृदुंग व अभंग म्हणत दिंडीचा मनसोक्त आनंद घेतला. त्याचप्रमाणे माहेश्वरी समाजातील एक महिला मंगल हेडा या नाशिकहून दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी झाल्या. त्यांची ही सातवी वारी असून मधुमेहाचा प्रचंड त्रास, दोन वेळा जेवणाअगोदर इंजेक्शन घेतल्याशिवाय जेवता येत नाही, पण माऊलींवर प्रचंड श्रद्धा. त्या श्रद्धेपोटी त्यांनी वेदनांवर मात करून आनंदाने दिंडी सोहळा साजरा केला.

माहेश्वरी पदयात्रा दिंडी सोहळ्यामध्ये ४५ लोकांची नियोजन समिती असून केदारनाथ भंडारी अध्यक्ष आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्य मनापासून दिंडीतील वारकर्यांची यथायोग्य सेवा करत असताना दिसत होते. खजिनदार म्हणून कार्यरत असणारे श्यामसुंदर साबू हे अनेक वर्षापासून दिंडीचा आर्थिक व्यवहार पाहत आहेत. माऊलीच्या कृपाशीर्वादाने अजूनही दहा वर्ष तरी मी सोहळ्याचा आनंद घेणार असल्याचा आत्मविश्वास ६५ वर्षाचे वय असलेल्या श्यामसुंदर साबू यांनी व्यक्त केला. दिंडीच्या मुक्कामी अनेक ह भप महाराज यांनी कीर्तन, प्रवचन, भारुड, समाज प्रबोधन सेवा विना मोबदला दिली. यामध्ये नाशिकचे श्री. माधवदास राठी, रामरावजी ढोक यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे इचलकरंजी, फलटण आदी भागातील माहेश्वरी समाजातील भजनी मंडळ, सेवाभावी संस्था, गायकांचे सुंदर कांड... आदी कार्यक्रम मोठ्या भक्तीभावाने साजरे करण्यात आले. वारकर्यांना वैद्यकीय सेवा देण्याचे काम अनेक संघटनांनी केले. शिस्त, उत्कृष्ट नियोजन व सर्वांची काळजी घेत माहेश्वरी दिंडीची वाटचाल पन्नासाव्या वर्षाकडे यशस्वीरित्या चालू आहे. २१ दिवसांच्या या प्रवासात अनेक दानवीरांनी भोजन व्यवस्था उत्तम ठेवली होती. पायी दिंडीचा हा अनुभव आयुष्यातील पहिलाच असला तरी अवर्णनीय होता. जात–पात भेद व वय विसरून सहभागी झालेला प्रत्येकजण फक्त आनंद घेत होता. पायी चालण्याच्या वेदना विसरत होता. वारीतील प्रत्येकाचे पाय पंढरपूरच्या मातीला लागले आणि पांडुरंग भेटल्याची आनंद अनुभूती प्रत्येकाने घेतली. म्हणून. एक तरी ओवी अनुभवावी तसे एक तरी वारी अनुभवावी... असे म्हटले तर ते ते वावगे ठरणारे नाही.



**– रमेश देशपांडे, पत्रकार अहिल्यानगर, मो. ९४२३७९३२२६.**

